रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २७३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ बुधवार, २२ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

रहाटाडच्या चविष्ट सोड्यांना खवय्यांची पसंती/२

रेवदंडा बागमळा येथे झाडावर वीज पडून आग/५

एमसीए स्पर्धेत रायगडच्या स्वराज गोवारींचे द्विशतक/८

## मुंबईत जन-आक्रोश महिला पदयात्रा आणि संमेलन



**मुंबई :** नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयक नाकारून काँग्रेस आणि त्यांच्या साथीदारांनी नारीशक्तीच्या प्रगतीमध्ये पुन्हा एकदा अडथळा आणला आहे. विरोधकांच्या या महिलाविरोधी भूमिकेच्या निषेधार्थ भाजप महायुतीतर्फे मंगळवारी (दि.२१) मुंबईत वरळीतील जांबोरी मैदान ते एनएससीआय डोम अशी जन–आक्रोश महिला पदयात्रा काढण्यात आली होती. त्यानंतर समारोपावेळी संमेलन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, मंत्री पंकजा मुंडे, माधुरी मिसाळ, मेघना बोर्डीकर, भाजप मुंबई अध्यक्ष अमित साटम, महापौर रितू तावडे, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार योगेश सागर, चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर आदी मान्यवरांसह माता–भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# भाजयुमोच्या युवाशक्ती जागर यात्रेस प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या युवाशक्ती जागर राजव्यापी यात्रेचा शुभारंभ मंगळवारी (दि.२१) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी राज्यात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि अर्बन नक्षलवादाच्या माध्यमातून तरुणांच्या मनात संविधानाविरुद्ध विष पेरणाऱ्या शक्तींना रोखण्याचे काम ही जागर यात्रा करेल, असा विश्वास व्यक्त केला.



भाजयुमोची युवाशक्ती जागर यात्रा संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणार असून शेतकरी, कामगार आणि आयटी क्षेत्रातील तरुणांपर्यंत पोहचणार आहे. शुभारंभ कार्यक्रमास भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजयुमो प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस आणि रवींद्र चव्हाण यांनी कार रॅलीला हिरवा झेंडा दाखवून यात्रेचा अधिकृत प्रारंभ केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्रात ३५ वर्षांखालील तरुणांची लोकसंख्या ६५ टक्के आहे. ही मोठी शक्ती जर संघटित होऊन एका दिशेने चालली, तर राज्यात मोठे परिवर्तन घडून येईल, मात्र सध्या काही शक्ती युवकांमध्ये संविधानाविरुद्ध कलुषित मते पसरवत आहेत. या तरुणांना संविधानाने दिलेल्या व्यवस्थेप्रती जागृत करण्याची जबाबदारी युवा मोर्चा पार पाडेल.

महिला आरक्षण विधेयकावरून मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर कठोर शब्दांत टीका केली. 'संसदेत विरोधकांनी महिला आरक्षणाची जणू भ्रूणहत्याच केली. जनगणना आणि पुनर्रचनेच्या (डिलिमिटेशन) नावाखाली विरोधक खोटे बोलून लोकांची दिशाभूल करत आहेत. मुळात त्यांना आरक्षण द्यायचेच नाही, ही त्यांची बुरसटलेली मानसिकता आहे. या यात्रेच्या माध्यमातून नारीशक्तीला जागृत करून विरोधकांना या विधेयकाला पाठिंबा देण्यास भाग पाडले जाईल,' असे त्यांनी नमूद केले.


कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली युवा मोर्चाला राज्यातील पहिल्या क्रमांकाची संघटना बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्य सरकारच्या योजना गावखेड्यातील शेवटच्या तरुणापर्यंत पोहवण्यासाठी ही यात्रा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी यात्रेच्या नियोजनाबाबत माहिती देताना, केवळ राज्यातीलच नव्हे तर केंद्रातील नेत्यांचे आणि विद्यार्थी चळवळीतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन या यात्रेसाठी घेण्यात आले असून राज्यातील संपूर्ण युवावर्ग या मोहिमेत जोडला जाईल, असे सांगितले.

## फटाका कारखान्यात स्फोट; १५ जण ठार, अनेक जखमी

**त्रिशूर, पालघर : वृत्तसंस्था**

केरळमधील त्रिशूर जिल्ह्यातील मुंडथिक्कोडु भागात मंगळवारी (दि.२१) एका फटाका निर्मिती युनिटमध्ये भीषण स्फोट झाला. यात १३ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. दुसरीकडे पालघर जिल्ह्याच्या वाडा तालुक्यातील कोनसई येथील फटाके कारखान्यातही स्फोट होऊन दोन कामगारांचा मृत्यू, तर तीन जण जखमी झाले आहेत.



त्रिशूर येथे स्फोट झाला, त्यावेळी युनिटमध्ये सुमारे ४० लोक काम करत होते. या दुर्घटनेत आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला असून पाच जणांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.

दुसऱ्या दुर्घटनेत कोनसई येथील स्फोटात भावेश दिलीप वावरे (वय २५, रा.जामघर) आणि मोनिका सचिन पडवळे (वय ३०, रा.पालसई) यांचा मृत्यू झाला, तर मोनिका मोहन वारदी, जागृती जगदीश गवते आणि प्रतिभा प्रताप पवार जखमी झाले असून जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे.

## सुनेत्रा वहिनींना रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करा -मुख्यमंत्री

**बारामती : प्रतिनिधी**

बारामती येथे विधानसभा पोटनिवडणुकीच्या सांगता सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा वहिनींना रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करण्याचे आवाहन नागरिकांना केले.



या सभेला केंद्रीय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले, मंत्री छगन भुजबळ, बाबासाहेब पाटील, दत्तात्रय भरणे, मकरंद जाधव–पाटील, उदय सामंत, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, सुप्रिया सुळे, रामराव वडकुते, पार्थ पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अजितदादांसोबत काम करण्याचा आनंद वेगळा होता, कारण दादांचा स्वभाव रोखठोक होता. एक न अनेक कामे दादांनी हातात घेतली होती, जी आम्ही पूर्ण करू.

अजितदादांच्या पश्चात सुनेत्रा वहिनींनी धुरा हाती घेतली आहे. मी मागील दोन–अडीच महिन्यांत वहिनींचे काम पाहिले. त्यानंतर दाव्याने सांगतो की, दादांची सगळी स्वप्न पूर्ण करण्याची क्षमता वहिनींमध्ये आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अजितदादांच्या स्मृतीचा यज्ञ सुरू आहे. या यज्ञात आपली आहुती टाकली नाही, तर मनात हुरहुर राहिली असती. त्यामुळेच दादांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आम्ही येथे आलोय. बारामतीकरांनीही आपल्या मतांची आहुती या स्मृतीयज्ञात द्यावी आहे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

## दापिवली बीपीसीएलमध्ये भूमिपुत्रांना रोजगाराची नवी संधी

### आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याला यश

**मुंबई : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील दापिवली येथे असलेल्या भारत पेट्रोलियम कंपनी लि. (बीपीसीएल)च्या बॉटलिंग प्लांटमध्ये स्थानिक भूमिपुत्रांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मंत्रालयात कामगारमंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांची मंगळवारी (दि.२१) महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत स्थानिक प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्रांना न्याय देण्याच्या दृष्टीने तिसऱ्या माथाडी कामगार टोळीच्या निर्मितीबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला.



सध्या दापिवली येथील प्लांटमध्ये दोन माथाडी कामगार टोळ्या कार्यरत असून त्यामध्ये केवळ सुमारे ३० टक्के स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार मिळत आहे. उर्वरित स्थानिकांना संधी मिळावी यासाठी तिसऱ्या टोळीची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत स्थानिकांच्या हक्कांचा मुद्दा ठामपणे मांडला. भूमिपुत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक आणि कायदेशीर बाबींवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस भारत पेट्रोलियम कंपनीचे व्यवस्थापक फिरोझ, जिल्हा परिषद सदस्य अनन्या गाताडे, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, माजी पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, अविनाश गाताडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी झालेल्या निर्णयामुळे स्थानिक युवकांना माथाडी मंडळाच्या माध्यमातून रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून प्रकल्पग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. स्थानिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला अखेर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

## निवडक

### मणिपूरमध्ये भूकंपाचे धक्के; नागरिकांमध्ये घबराट

**इंफाळ :** मणिपूरच्या अनेक भागांमध्ये मंगळवारी (दि. २१) पहाटे ५.५९ वाजता भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.२ इतकी नोंदवण्यात आली असून त्याचे केंद्र कामजोंग जिल्ह्यात होते. धक्के जाणवताच नागरिकांमध्ये घबराट पसरून अनेकजण घराबाहेर आले. या धक्क्यांचा परिणाम शेजारच्या नागालँड आणि आसाम राज्यांमध्येही जाणवला.

### नवी मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त लाच घेताना जेरबंद

**नवी मुंबई :** येथील महानगरपालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाचे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांना एका कंत्राटदाराचे बिल मंजूर करण्यासाठी फाईलवर सही करण्याकरिता ४२ हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी (दि.२१) रंगेहाथ अटक केली. विशेष म्हणजे ही कारवाई पालिका मुख्यालयात गायकवाड यांच्याच केबिनमध्ये सापळा रचून करण्यात आली. त्यामुळे एकच खळबळ उडाली असून अधिक तपास सुरू आहे.



**कर्जत : येथील ग्रामदैवत श्री धापया महाराजांच्या उत्सवानिमित्त शंभरहून अधिक वर्षांची परंपरा असलेल्या कुस्तीच्या आखाड्यात अखेरची लढत पुण्याचा आदित्य कांबळे आणि कल्याणचा प्रतिक भंडारी यांच्यात झाली. यात आदित्य अजिंक्य ठरला. त्याला मानाची गदा देऊन गौरविण्यात आले.** (वृत्त उद्याच्या अंकात)

## लोणेरेत हत्या झालेल्या तरुणीची ओळख पटली

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

**आरोपीचा शोध सुरू**

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील लॉजवर अमानुषपणे हत्या करण्यात आलेल्या तरुणीची ओळख पटली आहे. पल्लवी मोरे (वय २२, रा. वडगाव, ता. माणगाव) असे तिचे नाव आहे. तिच्या हत्येप्रकरणी गोरेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

लोणेरे येथे मुंबई–गोवा महामार्गालगत आलेल्या ओमकार रेसिडेन्सीत पल्लवी मोरे हिचा मृतदेह २० एप्रिल रोजी रूम नंबर १०१मध्ये रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आला होता. धारदार शस्त्राने तिच्यावर वार केल्याचे निदर्शनास आले. आरोपीविरोधात गोरेगाव पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात हत्या, लैंगिक अत्याचार आणि अॅट्रॉसिटी अॅक्टच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून रायगड आणि रत्नागिरी पोलिसांची चार पथके सध्या आरोपीचा माग काढत आहेत.



## सीएसएमटीजवळ दोन लोकलचा अपघात टळला

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे मंगळवारी (दि.२१) मोठा रेल्वे अपघात टळला. बदलापूरहून येणारी फास्ट लोकल नियोजित ४ नंबर प्लॅटफॉर्मऐवजी अचानक ५ नंबर प्लॅटफॉर्मकडे वळू लागली, पण त्या प्लॅटफॉर्मवर आधीच एक लोकल उभी होती. समोरच दुसरी लोकल उभी असल्याचे लक्षात येताच येणाऱ्या लोकलच्या मोटरमनने प्रसंगावधान राखत तत्काळ ब्रेक लावले.

मोटरमनच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणली. बदलापूरहून आलेली लोकल मागे घेण्यात आली, तर ५ नंबर प्लॅटफॉर्मवरील लोकलला दुसऱ्या ट्रॅकवरून पुढे पाठवण्यात आले. त्यानंतर संबंधित लोकलला योग्य प्लॅटफॉर्मवर आणण्यात आले.

## न्हावा शेवा बंदरातून १३२ कंटेनर जप्त

### आयात निर्बंधांना बगल; आरोपीला अटक

**उरण : बातमीदार**

तस्करीविरोधातील एका मोठ्या मोहिमेत महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) न्हावा शेवा बंदरावर चुकीची माहिती दिलेल्या मालाने भरलेले १३२ कंटेनर्स जप्त केले आहेत. या रॅकेटशी संबंधित मुख्य आरोपीलाही अटक करण्यात आली आहे.



डीआरआय अधिकाऱ्यांनी सुमारे ३,०२९ मेट्रिक टन माल असलेले कंटेनर्स जप्त केले. या मालाचे एकूण मूल्य सुमारे १३९ कोटी रुपये आहे. मालाची नोंद खोट्या पद्धतीने तूरडाळ म्हणून करण्यात आली होती. सखोल तपासानंतर असे उघड झाले की, या साठ्यांमध्ये प्रत्यक्षात टांझानिया आणि सुदानमधून आयात केलेल्या २,७१० मेट्रिक टन कलिंगडाच्या बिया आणि कॅनडाकडून मिळवलेल्या ३१९ मेट्रिक टन हिरव्या वाटाण्यांचा समावेश होता.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सरकारने लादलेल्या कडक आयात निर्बंधांना बगल देण्याच्या विशिष्ट उद्देशाने ही चुकीची माहिती देण्यात आली होती. या संघटित तस्करी प्रकरणात प्रमुख आरोपी असलेल्या आयात करणाऱ्या कंपनीच्या मालकाला अटक करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## अटल सेतू ते एक्सप्रेस वे जोडमार्ग प्रगतिपथावर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख शहरांमधील प्रवासाचे अंतर अवघ्या काही मिनिटांवर आणणाऱ्या अटल सेतू ते मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग या जोडप्रकल्पाने (कनेक्टर) महत्त्वाचे अभियांत्रिकी टप्पे ओलांडले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) या कामाला विशेष गती दिली आहे. या प्रकल्पामुळे 'मुंबई ३.०'च्या संकल्पनेला बळ मिळणार असून नवी मुंबई विमानतळ आणि पुण्याकडे जाणारा प्रवास सिग्नलविरहित होणार आहे.



(संकलित छायाचित्र)

७.३५ किमी लांबीच्या या सहा मार्गिकांच्या पुलाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. एकूण १७६ पायाभूत ठिकाणांपैकी १४३ ठिकाणचे काम पूर्ण झाले असून १४१ ठिकाणी पियर्स (खांब) उभे राहिले आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ८३० प्रीकास्ट गर्डर्सपैकी ६५३ गर्डर्सची उभारणी पूर्ण झाली आहे. पळस्पे परिसरात द्रुतगती मार्गाला जोडण्यासाठी स्लिप रोड्स आणि सर्व्हिस रोड्सच्या रुंदीकरणाचे कामही समांतरपणे सुरू आहे, ज्यामुळे वाहतूक कोंडीविना प्रवाशांना महामार्गावर प्रवेश मिळेल.

### नव्या विकासकेंद्रांना जोडणारा दुवा

फेब्रुवारी २०२७पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे एमएमआरडीएचे उद्दिष्ट आहे. हा मार्ग नव्या विकासकेंद्रांना जोडणारा दुवा ठरेल. यामुळे मुख्य मुंबईवरील ताण कमी होऊन नवी मुंबई आणि आसपासच्या भागात औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल. समुद्री पूल, द्रुतगती मार्ग आणि मेट्रो नेटवर्कचे एकात्मिक जाळे विणण्याच्या एमएमआरडीएच्या योजनेतील हा एक महत्त्वाचा दुवा आहे.

हा कॉरिडॉर पूर्ण झाल्यानंतर अटल सेतूमार्गे (शिवडी–न्हावा शेवा) चिर्ले आणि पळस्पेवरून थेट पुण्याकडे जाता येईल. यामुळे प्रवासाच्या वेळेत मोठी बचत होणार असून लॉजिस्टिक्स क्षेत्रालाही गती मिळणार आहे. विशेष म्हणजे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालाही या मार्गामुळे सुलभ प्रवेश मिळणार असल्याने हा मार्ग भविष्यात मुंबई आणि पुण्याच्या आर्थिक प्रगतीचा कणा ठरणार आहे.

अटल सेतूमार्गे मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर आता सिग्नलविरहित प्रवास शक्य होईल. यामुळे नोकरदार आणि विद्यार्थ्यांचा दैनंदिन प्रवास सुलभ होईल. 'मुंबई ३.०' घडवताना तासांचा प्रवास मिनिटांत आणण्याचे 'मुंबई इन मिनिट्स' हे उद्दिष्ट या प्रकल्पाद्वारे पूर्ण होत आहे.

## रायगडात अवकाळी पावसाची हजेरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

उन्हाच्या तडाख्याने हैराण झालेल्या रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसाने सलग दोन दिवस हजेरी लावली. सोमवारी दक्षिण रायगडात पावसाच्या हलक्या सरी बरसल्या होत्या, तर मंगळवारी (दि.२१) पहाटे उत्तर रायगडमधील बहुतेक तालुक्यांमध्ये विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाच्या सरी बरसल्या.

मागील काही दिवस रायगड जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट दिला होता. त्यानुसार मंगळवारी पहाटे सहा वाजल्यापासून विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट सुरू झाला. थोड्या वेळाने पावसाच्या सरी बसरण्यास सुरुवात झाली. अलिबाग, पेण, कर्जत, खालापूर तालुक्यांमध्ये पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी बरसल्या.

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा परिसरात गारपीटही झाली, तर बागमळा येथे ताडाच्या झाडावर भली मोठी वीज पडली. याशिवाय कोपर येथे मनोज ठाकूर यांच्या अंगणातील नारळाच्या झाडावरही वीज कोसळली. त्यामुळे झाडाने पेट घेतला. या विजेच्या धक्क्याने ठाकूर यांच्या घरातील टीव्ही, फ्रिजसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे नुकसान झाले आहे.



याआधी सोमवारी दक्षिण रायगडातील महाड पोलादपूर, माणगाव तालुक्यांमध्ये पावसाने हजेरी लावली होती, तर मंगळवारी अलिबाग, पेण, कर्जत, खालापूर, पनवेल, उरण परिसरात पावसाच्या सरी बरसल्या. अचानक आलेल्या या पावसामुळे रायगडकरांची त्रेधातिरपीट उडाली.

# वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

आषाढी वारी काळात निघणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी दोन्ही पालखी मार्गावरील पालखीतळे अधिक चांगली व सुविधायुक्त करण्यात यावीत, वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी तसेच पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पालखी मार्गांवरील विश्रामस्थळ सुविधा निर्मिती संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी यावेळी उपस्थित होते.पुणे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील विविध विकास कामांची माहिती दिली.



श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील विविध विकास कामांसाठी सुमारे १३०३ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यापैकी ९६४ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यातील ९५९ कोटी रुपये खर्च झाले आहेत. या आराखड्यांतर्गत दोन्ही पालखी मार्गातील पालखीतळांच्या ठिकाणी स्वच्छतागृहांसाठी सेफ्टी टँक, कमानीचे बांधकाम करणे, जमीन सपाटीकरण करणे, हायमास्ट पोल उभारणे, संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे, रस्त्यांची दुरुस्ती, पालखी कट्टा तयार करणे आदी कामांपैकी बहुतांश कामे पूर्ण झाली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, यंदा २५ जुलै रोजी आषाढी एकादशी आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान ८ जुलै रोजी तर श्री संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान ७ जुलै रोजी होणार आहे. दोन्ही पालखी मार्गावर वारकरी भाविकांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी. पालखी सोहळ्याच्या विश्वस्तांशी चर्चा करून त्यांना आणखी कोणत्या सुविधा हव्यात त्या करून द्याव्यात. पालखी तळावर कायमस्वरुपी पायाभूत सुविधांची कामे करावीत. पालखी तळावर वारकऱ्यांसाठी गेल्या वर्षी हँगरची व्यवस्था करण्यात आली होती, त्या प्रमाणे यंदाही अतिरिक्त हँगरची व्यवस्था करावी. पालखी मार्गावरील महामार्गांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत.

पुलकुंडवार म्हणाले की, पालखी मार्गावरील विकास कामे पूर्ण करण्यात येत असून यावर्षी वारकऱ्यांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत, याची दक्षता घेतली आहे. गेल्या वर्षी दोन्ही पालखी मार्गावर ३७०० मोबाईल शौचालये पुरविण्यात आली होती. यंदा ५ हजार मोबाईल शौचालये पुरविण्याचे नियोजन आहे.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने दोन्ही पालखी मार्गावरील महामार्गाची कामे जवळपास पूर्ण होत आली आहेत.

# चोरी करून पळून जाणाऱ्या महिलेस पोलिसांकडून अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नवीन देहेन येथील घरत सुमारे २३ लाख रुपये किमतीच्या वस्तू चोरी करून उत्तरप्रदेशात पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या एका महिलेस तिच्या साथीदारासह पोयनाड पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून चोरी केलेला सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राणी शुभम जयसवाल (पुर्वीश्रमिची राणी विनायक चव्हाण) , शुभम जयसवाल अशी अटक करण्यता आलेल्या आरोपींची नावे आहेत.



पनवेल तालुक्यातील धानसर येथे राहणारी राणी चव्हाण हिने नवीन देहेन येथील घरात घुसून राहणऱ्या लोकांना कोंडून ठेवून घरातील २३ लाख रुपयांच्या वस्तू चोरून नेल्या होत्या. त्याबाबत फिर्यादींच्या तक्रारीनुसार पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोयनाड पोलिसांचे पथक तयार करण्यात आले.

राणी विनायक चव्हाण आपला साथीदार शुभम जयसवाल याच्यासह उत्तरप्रदेश येथे पलायन करण्याचे तयारीत असल्याची माहिती पोयनाड पोलिसांना मिळाली. पोयनाड पोलिसांच्या पथकाने तिला तुर्भे नवी मुंबई येथुन ताब्यात घेतले. मुख्य आरोपीत राणी चव्हाण हिचे सोबत असलेला शुभम पप्पु (पवनकुमार) जयसवाल याचा देखील गुन्हयात सहभाग असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.आरोपीनी चोरी केलेला सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन असा २३ लाख ५ हजार किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोयनाड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुजित गडदे , सहाय्यक फैजदार नवना म्हात्रे, पोलीस हवालदार सुरेश वाघमारे, पोलीस हवालदार मंगेश लांगी यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# उरण परिसरात पावसाची दमदार एन्ट्री



**उरण : बातमीदार**

उरण शहर आणि परिसरात आज सकाळी अचानक वातावरणात बदल होऊन ढगांच्या भीषण गडगडाटासह पावसाने हजेरी लावली. अरबी समुद्रावरील बाष्पयुक्त वारे आणि वाढलेल्या आर्द्रतेमुळे (Humidity) हे भौगोलिक बदल झाले असून, सकाळच्या या पावसामुळे उरणकरांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळाला आहे.

वाढत्या तापमानामुळे स्थानिक स्तरावर अभिसरण (Convective) ढग तयार होऊन पावसाचा शिडकावा झाला. लग्नाचा सीझन असल्याने सकाळच्या या पावसामुळे वरमाई आणि वरबापांची मोठी धावपळ उडाली, नियोजनात काही काळ अडथळे आले.

IMD नुसार, पुढील २४ तास आकाश ढगाळ राहणार असून दुपारनंतरही अधूनमधून पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे

# मान्सूनपूर्व कामांना सीबीडी बेलापूरमध्ये आला वेग

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेने मान्सूनपूर्व कामांना वेग दिला असून बेलापूर सह विविध ठिकाणी स्वच्छता, गटार सफाई आणि जलनिस्सारण व्यवस्थेची कामे सुरू करण्यात आली आहेत. नागरिकांना पावसाळयात कोणताही त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर तयारी सुरू आहे.



या पार्श्वभूमीवर बेलापूर सीबीडी येथील स्थानिक नगरसेवक डॉ.जयाजी नाथ यांनी मंगळवारी संबंधित अधिकाऱ्यांसह परिसरातील सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी गटारांची स्वच्छता, नालेसफाई, पावसाळ्यापूर्वीची आवश्यक दुरुस्ती कामे आणि पाणी निचऱ्याच्या व्यवस्थेचा आढावा घेतला.

डॉ.नगरसेवक जयाजी नाथ यांनी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. विशेषतः गटारातून व नाल्यांतून काढण्यात आलेला कचरा त्वरित उचलण्यात यावा, अन्यथा पुन्हा तोच कचरा वाहून जाऊन अडथळे निर्माण होऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच पावसाळ्यात कुठेही पाणी तुंबणार नाही, यासाठी जलनिस्सारण व्यवस्था सक्षम ठेवण्यावर भर देण्यात आला. नागरिकांच्या सुरक्षिततेसह स्वच्छ आणि सुस्थित शहरासाठी ही मोहीम राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या पाहणी दौऱ्यात कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे, सॅनिटरी इन्स्पेक्टर लवेशपाटील, तसेच संबंधित कॉन्ट्रॅक्टर उपस्थित होते.

# अग्निशमन सप्ताहाचा समारोप समारंभ उत्साहात

**उरण : बातमीदार**

ओएनजीसी उरण, द्रोणागिरी बिल्डिंग येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये सोमवारी अग्निशमन सेवा सप्ताहाचा समारोप सोहळा आयोजित करण्यात आला होता. जीजीएम/प्लांट मॅनेजर एस. एन. अहमद यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते

यावेळी सीजीएम (सपोर्ट मॅनेजर) संजीव मोहन, सीजीएम (एचएसई) शरद सोनकर, सीजीएम (पी) श्रीमती अर्चना श्रीवास्तव, सीजीएम (पी) एच. एस. साहू, जीएम, ओएनजीसी फायर सर्व्हिस, सीआयएसएफ युनिट ओएनजीसी मुंबईचे उप कमांडंट/फायर लोकेश चंद यांच्यासह इतर प्लांट अधिकारी, सीआयएसएफ कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात ओएनजीसीच्या गीताने झाली, त्यानंतर अग्निशमन सेवा सप्ताहादरम्यान आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांवर प्रकाश टाकणारे पॉवरपॉइंट सादरीकरण करण्यात आले.यामध्ये उद्घाटन सोहळा, शाळा, रुग्णालये, सीआयएसएफ कॉलनी आणि जवळच्या गावांमध्ये आयोजित अग्निसुरक्षा प्रशिक्षण सत्रे, तसेच ओएनजीसी कर्मचारी, सीआयएसएफ कर्मचारी आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी अग्निसुरक्षा जागृतीला प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. ओएनजीसी उरण प्लांटच्या वरिष्ठ अग्निशमन अधिकारी श्रीमती श्वेता आर. जी. यांनी आभार मानल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.

# द.ग. तटकरे महाविद्यालयात ऑनलाइन वेबिनार

**तळा : प्रतिनिधी**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयात डेलनेट रिसोर्सेस अॅन्ड सर्व्हिस या विषयावर नुकतेच ऑनलाईन वेबिनार पार पडले.हा कार्यक्रम IQAC व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने नुकताच आयोजित करण्यात आला होता.

या वेबिनारसाठी DELNET, पुणे येथील Senior Network Assistant रोहिदास राठोड यांनी मार्गदर्शन करत DELNET च्या विविध सेवा, ई–जर्नल्स, ई–बुक्स, इंटर लायब्ररी लोन व डिजिटल डेटाबेसचा प्रभावी वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे पोर्टलचा वापरही दाखवून दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भरत चाळके यांनी केले, तर परिचय ग्रंथपाल मनोज वाढवळ यांनी करून दिला.

# रहाटाडच्या चविष्ट सोड्यांना खवय्यांची मिळतेय पसंती

**तळा : संध्या पिंगळे–ठाकूर**

तळा तालुक्याला लाभलेला समुद्र किनारा हा मांदाड खाडीकाठच्या कोळ्यांना मच्छीमारीसाठी लाभलेला सुवर्ण असा भाग आहे.या काठालगत तालुक्यातील रहाटाड ,वाशीह वेली,मांदाड,मजगांव,कुडे, गिरणे,रोवळा इत्यादी गावे आहेत.या खाडीकाठच्या रहाटाड या गावचे सोडे प्रसिद्ध आहेत.कोणीही विश्वासाने खरेदी करावे असे असतात.त्या सोड्यांमध्ये कोणतीही फसवणूक होत नाही.त्यामुळे या सोड्यांना मुंबई,पुणे ते रायगड जिल्ह्यातील सर्व भागांतून खवय्यांची पसंती आहे. दरवर्षी मागणीत वाढ होत आहे.मात्र रहाटाड गावच्या २५ ते ३० इंजिनवरील होड्या होत्या,त्या आता दोन ,तीन राहिल्याने मच्छीमारीत घट झाली आहे.त्याचा परिणाम पूर्वी पेक्षा आता सोड्यांच्या उत्पादनात घट झाल्याचे पहावयास मिळत आहे.



रहाटाड येथील कोळी बांधव या सोड्यांसाठी मोठ्या जिकरीने खाडीत उतरून आपल्या होड्या घेऊन समुद्रात खोल पर्यंत जातात.दिघी बंदराच्या परीसरा पासून सहा ते सात वाव आत समुद्रात मच्छीमारी करतात.अंदाजाने या भागात चांगल्या प्रकारची व रूचकर चवीला असणारी मोठी कोळंबी मिळत असते.उधानाच्या भरतीवर जसजसा उन्हाळा येत जातो व पावसाळ्याची चाहूल मच्छीला जाणवते तेव्हा अधिक प्रमाणात कोलंबीची मासेमारी होते.ही आणलेली कोळंबी पूर्वीपासून रहाटाड येथील कातळावर व सिमेंटच्या ओट्यावर मोठ्या मेहनतीने सुकविली जाते.आता मात्र या ओट्यांवरती कमीप्रमाणात सोडे सुकविले जात असून आता येथील कोळी बांधव खोल समुद्रा पर्यंत काही दिवस मच्छीमारी साठी जातात.तेथे चांगली कोळंबी मिळते.ती सुकवून त्यांचे सोडे सुकवून आणत असतात.

यावर्षी १५००ते २५०० रू.किलो दरम्यान भाव आहे.त्यातही वाढ होण्याची शक्यता आहे.मच्छिमारी करताना होणारा त्रास व खर्च यादृष्टीने सोड्यांचा भाव हा कमी आहे.तसेच आता हवे तसे उत्पादन मिळत नसल्याने व अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने कोळी बांधवांचा नोकरीसाठी मुंबई पुणे कडे जाण्याचा कल अधिक वाढल्याने ठराविक कोळी बांधव मच्छीमारी करत आहेत.

पूर्वी हे रहाटाडचे कोळी बांधव हातवल्ह्याच्या साहाय्याने साध्या होड्या घेऊन रहाटाड बंदर ते आगरदांडा असा प्रवास ३ तासात पार करायचे कालांतराने बंदरात यांत्रिकी होड्या आल्या तेच अंतर आता पाऊण ते एक तासात पार करू लागले.त्यामुळे वेळेची बचत होऊन ताजी मासळी लोकांपर्यंत पोहचू लागली .अशा या कोळीवाड्यात मच्छीमार सोसायटी असणे गरजेचे आहे.पूर्वी या कोळीवाड्यात विजय मच्छीमार सोसायटी कार्यरत होती.आता मात्र ही बंद अवस्थेत आहे.तरीसुध्दा हे कोळी बांधव आपला पारंपारिक व्यवसाय जपत असून खवय्यांना ओरिजनल सोडे देत आहेत.ही जर मच्छीमार सोसायटी अथवा नवीन मच्छीमार सोसायटी सुरू झाली तर येथील कोळी बांधवांना होड्या,डिझेल,जाळे इत्यादी साहित्य या द्वारे पुरवठा होऊन सध्या ठराविक होड्यांतून मच्छीमारी होते ती अधिक होड्या वाढून मच्छीमारी अधिक होईल व रहाटाड हे ओरिजल सोड्यांसाठी अधिक प्रसिद्ध होईल.असे कोळी बांधव बोलल जात आहे.

# कौशल्य विकास कार्यशाळेतून उद्योजक निर्मितीस प्रेरणा : डॉ. मेधा सोमय्या




**अलिबाग : प्रतिनिधी**

कौशल्य विकास कार्यशाळेतून उद्योजक निर्मितीस प्रेरणा मिळते. आत्मनिर्भर भारत साठी अशा प्रशिक्षणाची नितांत गरज असल्याचे मत जन शिक्षण संस्थान रायगडच्या संस्थापक अध्यक्षा डॉ मेधा सोमय्या यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड व नांदी व लोरियल फाउंडेशन सी.एस.आर प्रोजेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील ब्युटी पार्लर ह्या कौशल्य विकास उपक्रमात रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून ३२० विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात आले. व त्यातील २६४ यशस्वी लाभार्थ्यांना सोमवारी ( दि. २०) ब्युटी फॉर बेटर लाइफ ह्या कौशल्यवृध्दी व क्षमता बांधणी कार्यशाळेचे मोफत टूलकिट व प्रमाणपत्र वाटप जन शिक्षण संस्थान रायगडचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमय्या यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

जन शिक्षण संस्थान रायगडचे अध्यक्ष डॉ नितीन गांधी, उपाध्यक्ष सौ रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ विजय कोकणे, बी.एम.व्ही ट्रस्ट च्या अध्यक्ष रत्ना जोशी, राजवर्धन जोशी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ प्रकाश यादव, प्राध्यापिका डॉ पूजा भालेराव, प्रतिनिधी सौरभ आंबीलपुरे, नंदी फाउंडेशनच्या समन्वयक प्रज्ञा अग्रवाल, आरती पांडे, जन शिक्षण संस्थान रायगडचे बोर्ड मेंबर नरेन जाधव, सनदी लेखापाल संजय राऊत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते . संचालक डॉ विजय कोकणे ह्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर अकाउंट मॅनेजर प्रतीक्षा चव्हाणयांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले.

# लेक लाडकी योजनमुळे मुलींच्या शिक्षणास चालना

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महिला आणि बालविकास विभागातर्फे १ एप्रिल २०२३ रोजी अथवा नंतर जन्माला येणा–या मुलीसाठी 'लेक लाडकी' योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात जानेवारी २०२४ ते मार्च २०२६ या कालावधीत एकूण ६ हजार २८० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. या योजनेमुळे आर्थिक परिस्थिती बेताची असणा–या कुटुंबातील मुलींना शिक्षणासाठी मदत होत आहे.

राज्यात मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देऊन मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या शिक्षणास चालना देणे, मुलींचा मृत्यूदर कमी करणे व बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे, शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी प्रोत्साहित करणे यासाठी मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी' ही योजना राज्यात सुरू करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जानेवारी २०२४ ते मार्च २०२६ या कालावधीत ७ हजार १९८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी एकूण ६ हजार २८० लाभार्थ्यांना प्रत्येकी ५००० रूपयांचा लाभ देण्यात आला आहे. ६ हजार २८० लाभार्थ्यांना एकूण ३ कोटी १४ लाखांचा निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे आपल्या मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी जास्तीत जास्त पालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी व जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक यांनी केले आहे.

**योजनेसाठी अटी :**

१.आई किंवा वडिलांनी कुटूंबनियोजन शस्त्रक्रीया करणे आवश्यक राहील. २. १ एप्रिल २०२३पूर्वी एक मुलगी किंवा मुलगा आणि आणि त्यानंतर दुसरी मुलगी किंवा जुळ्या मुली जन्माला आल्यास त्यांना या योजनेचा लाभ मिळेल.३.जुळ्या दोन्ही मुलांना स्वतंत्र लाभ देण्यात येईल. ४.लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.

**आवश्यक कागदपत्रे :**

१.लाभार्थी जन्माचा दाखला २.कुटुंबप्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला याबाबात तहसिलदार किंवा सक्षम अधिका–यांचा दाखला आवश्यक ३.लाभार्थीचे आधारकार्ड ४.पालकांचे आधारकार्ड

# पनवेलमध्ये 'लेन्सकार्ट'चा निषेध

## भाजप युवा मोर्चाकडून व्यवस्थापनाला आंदोलनाचा इशारा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लेन्सकार्ट कंपनीच्या काही शाखांमध्ये कार्यरत हिंदू कर्मचाऱ्यांवर त्यांच्या धार्मिक आचरणांबाबत निर्बंध घातले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नवीन पनवेल युवा मोर्चा, भारतीय जनता पक्षाच्या वतीने कंपनीविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, काही शाखांमध्ये हिंदू कर्मचाऱ्यांना कुंकू, टिळा, गंध लावण्यास तसेच हातावर धार्मिक दोरा धारण करण्यास मनाई करण्यात येत आहे. याशिवाय, काही ठिकाणी हिंदू सण साजरे करण्यावरही बंधने घालण्यात आल्याचे समोर आले आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून तो भारताच्या संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे. या संदर्भात नवीन पनवेल युवा मोर्चा भाजपाचे अध्यक्ष मयूर कदम यांनी पनवेल येथील लेन्सकार्ट व्यवस्थापनाला लेखी निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, भारत हा विविध धर्मांचा देश असून प्रत्येक नागरिकाला आपल्या श्रद्धेनुसार व धार्मिक परंपरांनुसार आचरण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही कंपनीकडून विशिष्ट धर्माच्या कर्मचाऱ्यांवर निर्बंध घालणे हे अयोग्य व निषेधार्ह आहे. म्हणूनच, संबंधित प्रकार तत्काळ थांबवून कंपनीने आपली अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत, याची हमी द्यावी.

या संदर्भात कंपनीकडून समाधानकारक स्पष्टीकरण न मिळाल्यास नवीन पनवेल युवा मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा लेन्सकार्ट व्यवस्थापनाला देण्यात आला आहे. यावेळी मयूर कदम यांच्या समवेत युवा मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# द्रोणागिरीत भरतीच्या पाण्यामुळे शेतीला धोका

## गाळ साचल्याने समस्या; उपाययोजनेची मागणी

**उरण : बातमीदार**

नवी मुंबईचे शिल्पकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या सिडकोने कोट्यवधी रुपये खर्चुन नवी मुंबईसह उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोडमध्ये समुद्राच्या भरतीचे पाणी साठवण्याचे नियोजन केले होते. यासाठी डच तंत्राचा वापर करीत सहा साठवण तलावाची निर्मिती केली, मात्र या तलावात मातीचा गाळ साचल्याने याचा मूळ उद्देश मागे पडला असून त्यावर आता खारफुटी उगवली आहे. त्यामुळे येथील शेतीत समुद्राच्या भरतीचे आणि पावसाचे पाणी जाऊन नागरिकांचे नुकसान होत आहे. त्यामुळे संबंधित विविध समस्या त्वरित सोडवाव्यात, अशी मागणी नागरिक करीत आहेत.


पाणीटंचाईवर तोडगा काढण्यासाठी पावसाच्या पाण्याची साठवणूक करून साठवण तलावाची निर्मिती करण्याचा घाट प्रशासनाने घातला, मात्र या तलावांची देखभाल दुरुस्ती न केल्याने पावसाच्या पाण्याबरोबरच गाळाचा थर मोठ्या प्रमाणात यामध्ये साचला आहे. यामुळे पाणी साठवण्याची क्षमता कमी झाली असून या तलावांच्या निर्मितीचा मूळ उद्देश मागे पडला. या भरावामुळे पावसाचे पाणी आजूबाजूच्या शेतीच्या वावरात शिरत असल्याने तलावाचा उपयोग कमी आणि नुकसान जास्त अशी परिस्थिती ओढावली आहे. विकासाच्या नावाने उरणमध्ये करण्यात आलेल्या या नियोजनाचा पुरता फज्जा उडाला आहे. गावामध्ये भर उन्हाळ्यात समुद्राच्या भरतीचे आणि साठवणूक केलेले पाणी शिरू लागले आहे. त्यामुळे गावातील नागरिकांच्या शेतीचे, घरांचे आणि सामानाचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे.

अन्नधान्य, कपडे आणि विद्युत उपकरणांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. द्रोणागिरी नोडमधील सिडकोच्या साठवण तलावामुळे भरतीचे पाणी बोकडवीरा, नवघर, कुंडेगाव आदी गावात शिरले. घरांमध्ये हे पाणी शिरल्याने अन्नधान्य, कपडे आणि विद्युत उपकरणाचे नुकसान झाले आहे. सिडको, जेएनपीटी आणि खासगी विकासकांनी विकासकामांचा धडाका लावल्याने याचा मोठा फटका स्थानिकांना मोठया प्रमाणात बसला आहे. सिडकोने या भागात पाच साठवण तलाव बांधले आहेत. समुद्राच्या भरतीचे पाणी येऊ नये व आलेले पाणी परत जाण्यासाठी लावण्यात आलेली झाकणे तुटल्याने पाण्याचा निचरा होण्यासाठी याचा कोणताही उपयोग होत नाही. उलट पाण्याचा निचरा करणारे नैसर्गिक नाले बुजवले गेल्याने शेतीचे नुकसान होत आहे.

> **किनारा नियमावली (सीआरझेड)च्या कक्षेत हे साठवण तलाव येत असल्याने तलावातील खारफुटी काढण्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. काही प्रमाणात पाणी काढण्याचे नियोजन केले जाणार आहे, तर भरतीचे पाणी येऊ नये यासाठी नाल्यांना बसविण्यात आलेली झाकणे दुरुस्त करण्यात येणार आहेत.**
> **-आर. पी. रोडे,**
> अधीक्षक अभियंता, द्रोणागिरी नोड

## निवडक

### पनवेलमधून विवाहिता बेपत्ता



**पनवेल** : तालुक्यातील कल्हे विठ्ठलवाडी येथून एक विवाहित महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कविता कैलास पवार (वय २४) वर्ण गोरा, उंची पाच फुट, बांधा मध्यम, डोळे काळे, केस काळे पांढरे लांब, नाक सरळ, चेहरा गोल असून, अंगात काळा पंजाबी ड्रेस, हातात हिरवी कडा बांगडी, नाकात चमकी, गळ्यात छोटे मंगळसूत्र आहे. तिला मराठी भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.शि.प्रकाश घुले (७७७७०४९२७२) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दशरथ मुंडे यांची निवड

**पनवेल** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पनवेल तालुक्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली आहे. दशरथ ना. मुंडे यांची मनसे पनवेल उपतालुका अध्यक्षपदी अधिकृत निवड करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात त्यांना जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, तालुकाध्यक्ष सोनवणे यांनी निवडीचे पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दीपक पाटील, पनवेल तालुका सचिव अल्पेश कडू, निर्दोष गोंधळी उपस्थित होते.



# मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या व्यक्तीचे दागिने लुटले

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे सेक्टर ६ परिसरात मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या एका ४९ वर्षीय व्यक्तीच्या गळ्यातील सुमारे अडीच लाख रुपयांची सोनसाखळी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी क्षणात हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. यापूर्वी महिलांना चोरटे लक्ष्य करत होते, मात्र सोन्याचे वाढलेले दर ध्यानात घेता आणि पोलिसांचा धाक कमी झाल्याने चोरट्यांनी पुरूषांनाही लक्ष्य करण्यास सुरूवात केली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कामोठेतील सेक्टर ६ ए परिसरातील एल्लोरा हाईट्स येथे राहणारे संबंधित व्यक्ती सकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास आपल्या पाळीव श्वानासह फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले होते. अचानक भरधाव वेगात दुचाकीवरून दोन चोरटे त्यांच्या दिशेने आले. काही कळण्याच्या आतच त्यांनी त्या व्यक्तीच्या गळ्यातील सोनसाखळी झडप घालून हिसकावली आणि क्षणार्धात घटनास्थळावरून पसार झाले.

या सोनसाखळीची किंमत सुमारे अडीच लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेनंतर पीडित व्यक्तीने तत्काळ कामोठे पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अरविंद मसलकर यांनी गुन्हा दाखल करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, सकाळी व सायंकाळच्या वेळी अशा प्रकारच्या स्त्री पुरूषांना लुटीच्या घटना घडत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी गस्त वाढवून अशा गुन्हेगारांवर आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# चोरी करण्याचा प्रयत्न, गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घराचा लॉक उघडून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात १६ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

अपूर्वा गुडेवार या सेक्टर १७, वास्तू विहार रोड, खारघर येथे राहत असून त्यांनी त्यांच्या वॉचमनला घराची चावी देऊन त्या पुण्याला गेल्या होत्या. १४ एप्रिल रोजी त्या परत आल्या. त्यावेळी त्यांनी वॉचमनकडील चावी घेतली आणि घरात प्रवेश केला. यावेळी कपाटाचा दरवाजा उघडा दिसला आणि सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. बेडरूम मधील कपाट उघडा होता आणि किचनमधील सामानदेखील अस्ताव्यस्त पडले होते. घरातील सामानाची पाहणी केली, मात्र सामानाची चोरी झाल्याचे आढळून आले नाही. सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता वॉचमनचा मित्र रोशन याने टी-शर्ट ने तोंड झाकून सीसीटीव्हीचा स्विच ऑफ केलेला दिसून आले. यावरून वॉचमेनने त्यांच्या घरात चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

# त्रिकुटाकडून तरुणाला मारहाण

**पनवेल :** स्टंटबाजी करणाऱ्या तरुणाला हटकले असता त्याने आणि इतर दोन अनोळखी व्यक्तीनी ३१ वर्षीय तरुणाला मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

नील भरत पुजारा हा एमजी रोड, पनवेल येथे राहत असून तो ज्येष्ठ नागरिक हॉल येथील चहाच्या टपरीवर चहा पिऊन स्कुटी वरून घरी जात होता. दर्ग्याजवळ आला असता स्कुटी वरील अनोळखी चालकाने स्टंटबाजी केली. यावेळी अरे तू उडवशील असे बोलला त्यानंतर हा रायडर लोकांचा इलाका आहे इथे असेच होतं असे बोलून त्याने हुज्जत घातली आणि त्या ठिकाणी उभे असलेल्या त्याच्या साथीदारांनी नील याला ठोशाबुयाने मारहाण केली. त्याच्या डोळ्यातून रक्त येऊ लागले. त्याला चक्कर आल्याने तो खाली बसला. त्याला लक्ष्मी आय केअर पनवेल येथे उपचारासाठी दाखल केले.

# पनवेलमध्ये डॉ. आंबेडकर जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार, ३० एप्रिल रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजन पटवर्धन हॉस्पिटलसमोरील नुतन गुजराती शाळेच्या प्रांगणात करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती आहे.

# पनवेलमध्ये पीएनजी गॅस पाईपलाईन कनेक्शनसाठी नोंदणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासनाच्या नैसर्गिक गॅस पुरवठा वाढविण्यावर भर दिला आहे.केंद्र शासनाच्या सूचनेनूसार एलपीजीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीने, ज्या भागात गॅस पाईपलाईन उपलब्ध आहे त्या भागातील नागरिकांनी पीएनजी गॅसचा अधिकाधिक वापरास जास्तीत जास्त प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल महानगरपालिका आणि महानगर गॅस लिमिटेड (MGL) यांच्या संयुक्त विद्यमाने पीएनजी (पाईपद्वारे नैसर्गिक वायू) गॅस पाईपलाईन कनेक्शनसाठी विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन रविवार, २६ एप्रिल रोजी लोकनेते दि.बा. पाटील शाळेमध्ये सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन पीएनजी गॅस कनेक्शनसाठी नोंदणी करावी, असे आवाहन महापालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि सोयीस्कर इंधनाचा वापर वाढविण्याच्या उद्देशाने जास्तीत जास्त नागरिकांनी महानगर गॅसचे कनेक्शन घेणे गरजेचे आहे. महानगर गॅस लिमिटेडकडून अखंड पीएनजी व सीएनजी पुरवठ्याची हमी देण्यात आली असून नागरिकांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे**

रहिवासी पुरावा (कोणताही एक), वीज बिल, इंडेक्स-२ ची प्रत, पासपोर्ट साईज फोटो, ओळखपत्र (आधार कार्ड / पॅन कार्ड /, मतदार ओळखपत्र / वाहन परवाना), ई-मेल आयडी, सक्रिय मोबाईल नंबर ही कागदपत्रे नोंदणीसाठी आवश्यक आहेत.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर विद्यालयात मार्गदर्शन सत्र



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात बारावी नंतरच्या संधी या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

आजच्या स्पर्धात्मक युगात १२ वी वाणिज्य पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी बारावी नंतरच्या संधी या मार्गदर्शन सत्राचे आयोजन २१ एप्रिल २०२६ या दिवशी करण्यात आले होते. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना बी.कॉम, बी.बी.ए, बीसीए यासारख्या पदवी अभ्यासक्रमांबरोबरच चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी, कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट, या सारखे व्यवसायिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तसेच बँकिंग, फायनान्स, मार्केटिंग, उद्योजकता आणि आयटी क्षेत्रातही मोठया प्रमाणात संधी उपलब्ध आहेत याबद्दल माहिती देण्यात आली. या सत्रास प्रमुख व्याख्याता म्हणून डॉ. किरण देशमुख या लाभल्या होत्या. योग्य मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची आवड व क्षमता लक्षात घेऊन करिअरची निवड केल्यास उज्जवल भविष्य घडविता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी १२ वी नंतर उपलब्ध असलेल्या विविध पर्यायाची माहिती घेऊन योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. सर्व पालक व विद्यार्थ्यांनी या सत्राचे आयोजन केल्याबद्दल प्राचार्या निशा नायर यांचे आभार मानले.



**पनवेल : वळवली येथे मुख्य रस्त्याच्या डांबरीकरणाचा शुभारंभ व विविध ठिकाणी स्ट्रीट लाइटचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी प्रभाग क्र.९चे अध्यक्ष सचिन चौधरी, नगरसेवक शशिकांत शेळके, नगरसेविका प्रतिभा सुभाष भोईर, दमयंती भोईर, मारूती चिखलेकर,सुभाष भोईर, निलेश भोईर, कृष्ण पालेकर, हरिश्चंद्र पेटकर, राजेश पेटकर, समित पालेकर, गोविंद पाटील, दगडू पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.**

# रसायनीत रानमेवा ताडगोळा दाखल



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मार्च, एप्रिल, मे महिना सुरू झाला की, रसायनीच्या परिसरात ताडफळ बाजारात विकायला आलेली दिसतात. कुणी या फळांना ताडफळ म्हणतात तर कुणी ताडगोळे असे म्हणतात. पांढऱ्या शुभ्र रंगाची आणि हाताला थंडगार लागणारी ताडफळे म्हणजे जणू एक रानमेवाच आहे, अशी माहीती रसायनी येथील निसर्ग अभ्यासक, पक्षीनिरीक्षक, कवी, लेखक, चारोळीकार अनिल दाभाडे यांनी दिली.

ताडफळ वा ताडगोळे या फळा विषयी अधिक माहिती देताना अनिल दाभाडे सांगितले की, रसायनी परिसर हा तसा निसर्ग रम्य असून चोहोबाजूंनी हिरवीगार डोंगरकडे आहेत. त्यावर अनेक प्रकारची झाडे आहेत. त्यात ताडांच्या झाडांची संख्या ही लक्षनीय अशी आहे.

रसायनी वरून सावळा कोन मार्गे पनवेलला जाताना रस्त्याच्या डाव्या बाजूला डोंगरकुशीत अनेक उंच उंच ताडांची झाडे दिसतात. ही उंच उंच झाडे दूरूनच आपले मन वेधून घेतात. अशा या उंच उंच ताडांच्या झाडांचे बारकाईने निरीक्षण केले तर त्या झाडांवर काळसर रंगाची मडकी टांगलेली दिसतात. ही मडकी त्या झाडापासून मिळणाऱ्या ताडी या रसासाठी लावलेली असतात. दररोज या मडक्यात ताडी जमा होते. ती ताडी काढून बाजारामध्ये विकतात. ताडी शौकीन ही ताजी ताजी ताडी मोठ्या आवडीने पितात. तर काहीजण ताडगोळे बाजारातून खरेदी करून घरी खाण्यासाठी नेतात. या ताडगोळ्यामध्ये औषधी गुणधर्म असल्याचे काही जाणकार सांगतात असे शेवटी निसर्ग अभ्यासक पक्षीनिरीक्षक अनिल दाभाडे यांनी आमच्या बातमीदाराशी बोलताना सांगितले.

# पनवेलमध्ये पावसाची हजेरी; नागरिकांची तारांबळ

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या पनवेलकरांना मंगळवारी सकाळी अचानक आलेल्या पावसाने थोडासा दिलासा दिला. दमट हवामानामुळे पावसाची चिन्हे दिसत असतानाच, सकाळी ८ वाजताच्या सुमारास पनवेलसह परिसरात पावसाने हजेरी लावली.

अवकाळी आलेल्या पावसासोबतच ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट यामुळे घराबाहेर नोकरीसाठी किंवा विविध कामांसाठी गेलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. रेल्वे स्थानक, मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि चौकांत अचानक आलेल्या पावसामुळे गोंधळ उडाला. दोन चाकी वाहनधारकांची त्रेधा उडाली; काही जणांनी झाडाखाली, तर काहींनी बस स्टॉपचा आसरा घेतला. अचानक आलेल्या या पावसाने रस्त्यांवर वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली, परंतु अनेकांनी याचा मनमुराद आनंदही घेतला.

पावसाच्या सरींसोबत आलेल्या गार वाऱ्याने वातावरण थोडं शांत झालं. पण कार्यालयाला जाणारे कर्मचारी, काही शाळांचे विद्यार्थी आणि दुचाकीवरून प्रवास करत असलेल्यांना पावसाने भिजवून टाकले.

हवामान विभागाने आधीच काही भागांत उकाड्याचा आणि काही भागांत पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. ही स्थिती येत्या काही दिवसांत पुन्हा निर्माण होऊ शकते असेही सांगण्यात आले आहे. पुढील दोन-तीन दिवस थोड्या फार सरींचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आजचा पाऊस हा केवळ हवामानातील बदल नव्हे, तर उकाड्याने हैराण झालेल्या पनवेलकरांसाठी दिलासा ठरला.

# सुनील शिरीषकर यांना टाटा विद्यापीठातून पीएचडी प्रदान



**पनवेल : वार्ताहर**

सामाजिक कार्यकर्ते सुनील शिरीषकर यांनी शहरी विकासामध्ये सोशिओ- इकॉनॉमी एंड लाव्हिलीहूड चॅलेंजस फेस बाय प्रोजेक्ट अफेक्टेड पीपल ऑफ बीएसयूपी प्रोजेक्ट ऐट कल्याण रीजन इन महाराष्ट्र विषयावरील प्रबंधासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मुंबई या विद्यापीठाकडून पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली आहे.

शिरीषकर यांना संशोधनासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स विद्यापीठाचे प्राध्यापक व स्कूल ऑफ सोशल वर्कचे माजी विभाग प्रमुख प्रो. हिलरीस बेक यांनी मार्गदर्शन केले. या प्रबंधाचे मूल्यमापन प्रा. अनुप कुमार भारतीय (युनिव्हर्सिटी ऑफ लखनाउ) आणि प्रा. अशोक कुमार सरकार (विश्व भारती विद्यापीठ, वेस्ट बंगाल) या दोन आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षकांनी केले आहे. तसेच सुनील शिरीषकर हे मागील वीस वर्षापासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थेत कार्य केले आहे, ज्यात त्यांनी विशेषता शिक्षण, आरोग्य, बालकांचे अधिकार, पुनर्वशन प्रकल्प, मानवी हक्क, समुदाय विकास आणि प्रकल्प व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

## संपादकीय

# परंपरा आणि नवता!

वाऱ्याची दिशा, झाडांची पालवी-मोहर, पक्ष्यांचे घरटे बांधण्याचे ठिकाण आणि कीटक-मुंग्यांच्या हालचाली यावरून पाऊसपिकांचे अंदाज वर्तवले जातात. निसर्गस्वभावाचे हे सूक्ष्म निरीक्षण बऱ्याचदा अचूक ठरते, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

**विज्ञानाच्या प्रगतीसोबत मानवी संस्कृतीदेखीलल प्रगत होत गेली असली, तरी परंपरांची जपणूक करण्याचा मानवी स्वभाव मात्र जगभरातील संस्कृतीने जपलेला दिसतो. परंपरांची सांगड विज्ञानासोबत घालण्याचा प्रयत्न झाल्याने ज्ञान अधिक समृद्ध झाल्याचेही अनेक पुरावे सापडतात. तरीही, अलीकडे 'पुराणातली वानगी' म्हणून परंपरांचा अनादर करण्याची मानसिकता बळावत चालल्याची खंत कानावर पडते, तेव्हा महाराष्ट्राने मात्र या मानसिकतेस फारसा थारा दिला नाही या जाणिवा सुखावणाऱ्या ठरतात. 'अल निनो' नावाच्या वातावरण बदलाच्या एका प्रभावामुळे निसर्गचक्र बदलून गेले आहे. निसर्गाचा स्वभावच बदलून गेल्याने नव्या निसर्गशैलीसोबत प्राणीमात्रांची जीवनशैली जुळविणे हे एक आव्हानदेखील ठरू पाहात आहे. अशा काळात, माणूस, निसर्ग आणि विज्ञान यांचा अनोखा मेळ साधणारा प्रयोग म्हणून 'भोंडवळची भाकिते' या आगळ्या संस्कृतीची दखल घ्यावी लागते. यंदा 'अल निनो'मुळे पावसाळ्याचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहील व पिकांचे उत्पादन, पाण्याची उपलब्धता व एकूणच जीवनशैलीवर त्याचे परिणाम होतील असा हवामानशास्त्राचा अंदाज असल्याने, संभाव्य संकटास तोंड देण्याची तयारी सर्व स्तरांवर सुरू झालेली असताना, परंपरागत अनुभव आणि निसर्गाच्या संकेतांचा मागोवा घेत वर्तविल्या जाणाऱ्या भोंडवळच्या भाकितांचे महत्व दखलपात्र ठरते. महाराष्ट्राच्या, कृषी संस्कृतीत आणि ग्रामीण समाजजीवनात 'भोंडवळची भाकिते' हा एक अत्यंत कुतूहलाचा आणि श्रद्धेचा विषय राहिला आहे. पावसाचा अंदाज वर्तवण्याची ही पारंपरिक पद्धत आजही टिकून आहे. आज हवामानाची भाकिते वर्तविणारी आधुनिक यंत्रणा विकसित झालेली असली तरी पारंपरिक अनुभवांच्या आधारावर बांधल्या जाणाऱ्या काही आडाख्यांचा आधार अजूनही राज्यातील शेतकरी घेत असतात. अशा काही नैसर्गिक संकेतांवर आणि भोंडवळसारख्या लोकविद्येच्या आडाख्यांनुसार पावसाचा नेमका अंदाज मिळाल्याने पेरणीच्या कामांचे नियोजन करणे सोपे जाते, हा शेतकऱ्यांचा पूर्वीपासूनचा अनुभव असल्याने आजही पेरणीपूर्वी भोंडवळच्या भाकितांचा एक संदर्भ म्हणून विचार केला जातो. विज्ञान प्रगत होत गेल्याने अशा परंपरागत ज्ञानाची अंधश्रद्धा किंवा भाकडकथा म्हणून संभावना केली जात असली, तरी शेतकऱ्यांच्या जगात भोंडवळच्या भाकितांचे स्थान मात्र आदराचे असल्यामुळेच, माध्यमांनादेखील याची दखल घ्यावी लागते. ही भाकिते म्हणजे केवळ अंधश्रद्धा नाहीत, तर ती पिढ्यानपिढ्या केलेल्या निसर्ग निरीक्षणावर आधारित असतात. हवामानाचे प्रगत साधनांनिशी वर्तविलेले अंदाज अनेकदा विस्तृत प्रदेशासाठी असतात, तर भोंडवळ किंवा पंचांगातील अंदाज हे एका विशिष्ट परिसराच्या संदर्भात असतात. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्याला आपल्या शेतात कोणत्या प्रकारचे पीक घ्यावे, याचा अंदाज बांधण्यास मदत होते. भोंडवळच्या निमित्ताने ग्रामीण भागात लोक एकत्र येतात, हवामानावर चर्चा होते आणि समुदायामध्ये माहितीची देवाणघेवाण होते. यामुळे सामाजिक बांधिलकी जपली जाते आणि कृषी संस्कृतीतील मौखिक ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होते. परंपरांची नवतेशी सांगड घालून सामाजिकता जपणारी ही अनोखी पद्धत यामुळेच दुर्लक्षित करता येत नाही. तरीही आधुनिक युगात उपग्रह आणि रडारच्या मदतीने मिळणारे अंदाज अधिक अचूक असले, तरी भोंडवळची भाकिते ही एक महत्त्वाची 'सांस्कृतिक पुंजी' आहे आणि आधुनिक विज्ञानासोबत या पारंपरिक ज्ञानाची सांगड घातल्यास ती शेतकऱ्यांसाठी अधिक फलदायी ठरू शकतात.**

# 'आई' धोरणातून महिला होणार आत्मनिर्भर

पर्यटन क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवून त्यांना नेतृत्व आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयामार्फत 'आई' हे महिला केंद्रित पर्यटन धोरण प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या धोरणांतर्गत महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विशेष पंचसुत्री आणि सवलती जाहीर करण्यात आल्या असून, अमरावती जिल्ह्यात या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील सुमारे १६० महिलांनी हॉटेल, रेस्टॉरंट, होमस्टे आणि वेलनेस सेंटर्स यांसारख्या विविध व्यवसायांसाठी आपली नोंदणी पूर्ण केली आहे.

या धोरणाचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे महिला उद्योजकांना मिळणारा आर्थिक आधार. पर्यटन व्यवसायाच्या उभारणीसाठी महिलांनी मान्यताप्राप्त बँकांकडून १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज घेतल्यास, त्यावरील १२ टक्क्यांपर्यंतच्या व्याजाचा परतावा पर्यटन संचालनालयामार्फत थेट लाभार्थ्याच्या आधार लिंक बँक खात्यात जमा करण्यात येतो. हा लाभ कर्ज परतफेड होईपर्यंत, किंवा ७ वर्षांच्या कालावधीसाठी, किंवा व्याजाची रक्कम ५ लाख रुपये पूर्ण होईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत) लागू राहते.

या योजनेअंतर्गत सुमारे ३० प्रकारचे व्यवसाय पात्र ठरवण्यात आले आहेत. यात प्रामुख्याने होम स्टे, हॉटेल, रिसॉर्ट, रेस्टॉरंट, कृषी पर्यटन केंद्र, साहसी पर्यटन (जमीन, हवा, जल), ट्रॅव्हल एजन्सी, टूर ऑपरेटर, आयुर्वेद व योग केंद्र, वेलनेस सेंटर, हस्तकला दुकाने आणि आदिवासी निसर्ग पर्यटनाशी संबंधित प्रकल्पांचा समावेश आहे. नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या किंवा अस्तित्वातील व्यवसायाची व्याप्ती वाढवू इच्छिणाऱ्या महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घ्यावा.

योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित पर्यटन व्यवसाय पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत असावा आणि त्याची मालकी पूर्णपणे महिलेकडे असणे अनिवार्य आहे. तसेच, महिलांच्या मालकीच्या हॉटेल किंवा ट्रॅव्हल एजन्सीमध्ये ५० टक्के व्यवस्थापकीय व इतर कर्मचारी महिला असणे बंधनकारक आहे. याशिवाय, व्यवसायासाठी आवश्यक सर्व शासकीय परवानग्या प्राप्त असाव्यात आणि कर्जाचे हप्ते वेळेत भरणे आवश्यक आहे.

इच्छुक महिला उद्योजकांनी पर्यटन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.maharashtratourism.gov.in) ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. अर्जासोबत ५० रुपये प्रक्रिया शुल्क भरल्याची पावती, पॅन कार्ड, आधार कार्ड, बँक पासबुक, व्यवसायाच्या जागेचा पुरावा (७/१२ उतारा किंवा भाडे करार), आणि ५०० शब्दांत प्रकल्पाची संक्षिप्त माहिती अशी कागदपत्रे अपलोड करावी. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर विभागाकडून 'सशर्त हेतू पत्र' दिले जाईल, ज्याच्या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करून घेता येईल.

या क्रांतीकारी धोरणामुळे राज्यातील महिलांना केवळ रोजगाराच्या संधीच मिळत नाही, तर पर्यटन क्षेत्राच्या विकासात त्यांचा सक्रिय वाटा राहत आहे. अधिक माहितीसाठी महिला उद्योजकांनी अमरावती येथील पर्यटन उपसंचालक कार्यालयाशी संपर्क साधावा व पर्यटन धोरणातून उद्योजिका बनण्याच्या स्वप्नांना गवसणी घालावी!

**-अपर्णा यावलकर**
**माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय,**
**अमरावती**

# महिला सक्षमीकरणाची दीपशिखा : सुषमा गायकवाड



ग्रामीण मातीत रुजलेली कष्टाची बीजे जेव्हा जिद्द, चिकाटी आणि दूरदृष्टीच्या पाण्याने सिंचित होतात, तेव्हा त्यातून उगवते यशाची हिरवीगार शेती. अशीच एक प्रेरणादायी कार्यगाथा म्हणजे श्रीम. सुषमा बालाजी गायकवाड, सहाय्यक कृषी अधिकारी, चिरनेर (ता.उरण, जि.रायगड) यांची. कृषी विभागाच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांच्या जीवनात स्वावलंबनाचा नवा उजेड निर्माण केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागांतर्गत 'आत्मा' (ATMA) योजनेच्या माध्यमातून श्रीम. गायकवाड यांनी महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा ध्यास घेतला. पारंपरिक शेतीपलीकडे जाऊन ऑयस्टर मशरूम लागवडीसारख्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची ओळख करून देत त्यांनी महिलांना स्वावलंबनाचा नवा मार्ग दाखविला.

Krishi Vigyan Kendra Roha येथे आवश्यक प्रशिक्षण व साहित्य उपलब्ध करून देत महिलांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी दिली. केवळ २० किलो बियाण्यांमधून ४० किलो उत्पादन मिळवत, अवघ्या ७७० रुपयांच्या खर्चात २३ दिवसांत १६,००० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळविण्याचा मार्ग त्यांनी महिलांसमोर उभा केला. या प्रयत्नांमुळे अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल घडून आला आणि महिलांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाचे हास्य फुलले.

"एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ" या विचाराचा अवलंब करत त्यांनी महिलांना स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून संघटित केले. बियाणे, खते व आधुनिक यंत्रसामग्रीच्या टंचाईवर मात करत सामूहिकतेच्या बळावर महिलांना सक्षम केले.

याचबरोबर उत्पादित मालाला योग्य बाजारपेठ मिळावी यासाठी स्थानिक सोसायट्या, आठवडी बाजार, हॉटेल्स व उपहारगृहे यांच्याशी संपर्क साधून थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे महिलांना त्यांच्या कष्टाचे योग्य मूल्य मिळू लागले.

या कार्यामागे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे भक्कम मार्गदर्शन लाभले. वंदना शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) अर्चना सुळ-नारनवर, तालुका कृषी अधिकारी, उरण, तसेच अलका बुरुकुल (उपकृषी अधिकारी) आणि नमिता वाकळे (आत्मा) यांच्या प्रेरणादायी सहकार्यामुळे हा उपक्रम अधिक प्रभावी ठरला. सोनाली जाधव यांच्यासारख्या महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देऊन त्यांनी परिसरातील अनेक महिलांना उद्योग-व्यवसायाकडे वळविले आणि लाभार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली.

कृषी क्षेत्रापुरतेच मर्यादित न राहता समाजसेवेच्या विविध क्षेत्रांतही त्यांनी मोलाचे योगदान दिले. महिला सबलीकरण, जेष्ठ नागरिकांना सहाय्य, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, धार्मिक संस्थांना मदत, तसेच कोरोना काळात अन्नदान यांसारख्या उपक्रमांत त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. महिला मेळावे, परिसंवाद, हळदी-कुंकू समारंभ आणि विविध बैठकींमधून त्यांनी समाजजागृतीचे कार्य अखंडपणे सुरू ठेवले.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल विविध वृत्तपत्रे व संस्थांनी घेतली. त्यांच्या समाजोपयोगी कार्याबद्दल "संजीवन कलाविकास प्रतिष्ठान तेजस्विनी पुरस्कार" आणि "हिरकणी पुरस्कार" यांसारख्या मानाच्या पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. हे पुरस्कार त्यांच्या अथक परिश्रमांची आणि समर्पित सेवाभावाची साक्ष देतात.यांचे कार्य हे विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, सकारात्मक विचार आणि अथक परिश्रम यांच्या संगमाचे उत्तम उदाहरण आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास महिला शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.

**-संजीवनी जाधव, सहायक संचालक, कोकण भवन, नवी मुंबई**

## बदलते तंत्रज्ञान

# रिअल-टाइम सर्च पॉवरसह आले नॅनो बनाना २

गुगलने आतापर्यंतचे आपले सर्वात वेगवान आणि प्रगत AI इमेज जनरेशन मॉडेल नॅनो बनाना २ लॉन्च केले आहे. हे नवीन टूल कल्पनेला उच्च-गुणवत्तेच्या चित्रात बदलू शकते. गुगल सर्चच्या मदतीने रिअल-टाइम माहितीचा वापर करून अचूक आणि वास्तविक दिसणाऱ्या प्रतिमा देखील तयार करते. हे सामान्य AI टूल्सच्या तुलनेत अधिक वेगाने आणि अधिक बारकाईने परिणाम देते.



चला जाणून घेऊया की हे टूल कसे उपयोगी पडू शकते

१. जुन्या फोटोला नवीन रूप देणे: चेहरा तोच, शैली नवीन

आपण अनेकदा आपल्या जुन्या फोटोची पार्श्वभूमी बदलू इच्छितो, पण चेहऱ्यात बदल होण्याची भीती असते. नॅनो बनाना २ च्या 'फेस कन्सिसटन्सी' वैशिष्ट्यामुळे आता तुम्ही तुमच्या फोटोमध्ये चेहरा तोच ठेवून फक्त कपडे, हेअरस्टाईल किंवा पार्श्वभूमी अचूकपणे बदलू शकता.

कसे करावे: फक्त फोटो अपलोड करा आणि सांगा- "माझा चेहरा तसाच राहू द्या, पण मला पर्वतांच्या पार्श्वभूमीवर फॉर्मल सूट घातलेला दाखवा." हे लगेच नवीन इमेज तयार करेल.

२. मुलांच्या अभ्यासात आणि प्रोजेक्ट्समध्ये मदत: आता स्वतः इन्फोग्राफिक्स तयार करा

या टूलची समज इतकी सखोल आहे की ते जटिल ग्राफिक्स देखील तयार करू शकते. उदाहरणार्थ, अनेकदा शाळेच्या प्रोजेक्ट्ससाठी आपल्याला इंटरनेटवर अचूक डायग्राम मिळत नाहीत.

बऱ्याचदा हे आपल्या भाषेतही मिळत नाहीत. या टूलच्या मदतीने तुम्ही तुमच्या आवडीच्या भाषेत ४K इन्फोग्राफिक बनवू शकता. हे इंग्लिश ग्राफिक्सला हिंदीमध्येही बदलू शकतात.

कसे करावे: जेमिनी ॲपमध्ये जाऊन म्हणा- "सौर मंडळाचा एक ४K चार्ट तयार करा, ज्यामध्ये प्रत्येक ग्रहाचे नाव हिंदीमध्ये लिहिलेले असेल." हे तुम्हाला त्वरित एक नवीन आणि मूळ इमेज तयार करून देईल.

याला निर्देश द्या की वॉटर सायकलचा एक ४K इन्फोग्राफिक तयार करा, ज्यामध्ये हिंदीमध्ये स्पष्ट लेबल्स लिहिलेले असतील. हे वाचण्यायोग्य मजकूर आणि वास्तववादी प्रकाशयोजनेसह इमेज तयार करेल.

# जागतिक वसुंधरा दिन

## निमित्त



पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जागृती करण्यासाठी हा दिवस जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी, संपातबिंदू पृथ्वी दिन पाळतात.

पर्यावरणरक्षणाची शिकवण देण्याच्या हेतूने अमेरिकेचा सिनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल, इ.स. १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला, तरीही त्या कार्यक्रमाचा राष्ट्रीय समन्वयक असलेला डेनिस हेस याने स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन करून पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला.

सध्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली.

पर्यावरणाच्या सतत ढासळणाऱ्या निसर्गाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि टिकाऊपणाला प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन साजरा केला जातो. हा दिवस आपल्याला आपली पृथ्वी आणि तिची परिसंस्थेच्या संरक्षणाच्या महत्त्वाची आठवण करून देतो.

पहिला वसुंधरा दिवस २२ एप्रिल १९७० रोजी साजरा करण्यात आला आणि तेव्हापासून हा पृथ्वीवरील प्रत्येक मानवासाठी एक जागतिक कार्यक्रम बनला आहे, लाखो लोकांनी वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, शैक्षणिक उपक्रम आणि इतरांना प्रेरणा देणे यासारख्या उपक्रमांमध्ये भाग घेतला. तसे करणे, आणि पृथ्वीच्या सुरक्षिततेसाठी ते अत्यंत आवश्यक आहे.

जगातील इतर देशांप्रमाणे भारतातही पर्यावरणाची स्थिती चांगली नाही, ज्याचा परिणाम भारताच्या हवामानावर होत आहे. भारतातील जागतिक वसुंधरा दिनाचे संवर्धन आणि पर्यावरणाचे महत्त्व समजून घेण्यासाठी येथे काही महत्त्वाच्या टिप्स आहेत. याची अंमलबजावणी करून आपण पृथ्वीच्या सुरक्षिततेसाठी हातभार लावू शकतो.


वृक्षारोपण मोहीम : जागतिक वसुंधरा दिनानिमित्त आपण वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला पाहिजे. शाळा, महाविद्यालय, कार्यालयात किंवा समाजातील सदस्यांसह रोपटे लावा.

संस्थेचा कार्यक्रम : एक संघटनात्मक कार्यक्रम आयोजित करा ज्यामध्ये प्रदूषण नियंत्रण, स्वच्छता मोहीम आणि पर्यावरण रक्षण यावर खुली चर्चा होईल.

सामुदायिक स्वच्छता मोहीम : परिसरातील काही मित्रांसोबत स्वच्छता मोहीम आयोजित करा, ज्यामध्ये स्थानिक ठिकाणे स्वच्छ करून पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी जनजागृती केली जाऊ शकते. पर्यावरण संरक्षणाशी संबंधित कार्यशाळा: पर्यावरण संरक्षणाशी संबंधित कार्यशाळा आयोजित करा, ज्यामध्ये लोकांना अधिक माहिती आणि नवीन कल्पना सामायिक करण्याची संधी मिळेल.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा




## आरोग्य प्रहर

# डायबिटीक रुग्णांनी आंबा खाल्ल्याने काय होईल?

मधुमेहाचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी नक्की काय खावे याबाबत अनेकदा वाद होतात. आज आपण खरोखरच मधुमेह असलेल्यांसाठी आंबा हे सुरक्षित फळ आहे का? याविषयी तज्ज्ञांकडून माहिती घेणार आहोत.

आंब्याचा ग्लायसेमिक इंडेक्स ५० ते ५५पर्यंत मध्यम असतो. (एखाद्या पदार्थाची रक्तातील ग्लुकोजची पातळी वाढवण्याची क्षमता मोजणारे हे एक मूल्य आहे. ग्लायसेमिक इंडेक्स जितका जास्त असेल तितका ग्लुकोज वेगाने शोषला जातो आणि रक्तातील साखरेची तीव्र वाढ होते). नियंत्रित मधुमेह असलेल्यांना कमी प्रमाणात आंब्याचे सेवन करण्यास हरकत नाही.



डॉ. मोहन डायबिटीज स्पेशॅलिटी सेंटर, चेन्नईचे अध्यक्ष डॉ व्ही मोहन यांनी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, आंब्यामुळे रक्तातील साखरेची वाढ होते पण ही नैसर्गिक साखर असते.

रिफाइंड पीठ किंवा तांदूळ खाल्ल्याने अचानक जशी रक्तातील साखर वाढते तसा त्रास होत नाही. आंब्यामध्ये भरपूर फायबर असते, ज्यामुळे साखरेचे शोषण आणि अँटी-ऑक्सिडंट्स कमी होतात. आंब्याला फळ म्हणून नव्हे तर कार्बोहायड्रेटचा स्त्रोत म्हणून पाहायला हवे.

मधुमेह असल्यास कार्ब्स व कॅलरीजचे सेवन प्रमाणात असणे गरजेचे असते. त्यामुळेच अर्धा किंवा पूर्ण आंबा खाणार असाल तर त्यादिवशी अन्य माध्यमातून (जसे की, भात, पोळी, अन्य फळे) कॅलरीचे सेवन टाळा.

तसेच आंब्याचे सेवन सुद्धा अर्ध्या किंवा जास्तीत जास्त एका आंब्याहून अधिक नसावे. आंबा हा मुख्य जेवणासह गोडाचा पदार्थ म्हणून खाऊ नये कारण यामुळे कॅलरीजचा भार वाढू शकतो. दिवसभरात रक्तातील साखरेचे प्रमाण स्थिर ठेवण्यासाठी स्नॅक्स म्हणून सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळी आंबा खाऊ शकता.

मॅक्स हेल्थकेअरच्या एंडोक्राइनोलॉजी आणि मधुमेह विभागाचे अध्यक्ष डॉ. अंबरिश मिथल यांनी पुढे अधोरेखित केले की, जर तुमच्या रक्तातील साखरेचे प्रमाण अनियमित असेल आणि कल-१ल (तीन महिन्यांतील सरासरी रक्तातील साखर) जास्त असेल, तर आंब्यासह अन्य कार्बोहायड्रेट-समृद्ध पदार्थ व फळंसुद्धा टाळायलाच हवीत.

# सर्वांनी मिळून आरोग्य यंत्रणा सुदृढ करूया -आरोग्य सभापती वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

जि.प.आरोग्य यंत्रणेच्या बाबतीत सामान्य नागरिकांच्या तक्रारी येत असून या यंत्रणेला सक्षम व सुदृढ बनवून नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देण्याचे काम आपल्याला आगामी काळात करावयाचे आहे असे आवाहन जिल्हा परिषद आरोग्य सभापती वैकुंठ पाटील यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना केले.



पेण विधानसभा मतदार संघातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कामकाजाची सविस्तर आढावा बैठक पेण येथील साई सहारा हॉल येथे पार पडली. या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुळकर, रोहा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियांका सोळुंखे, पेण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील नखाते, सुधागड तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी, जेएसडब्ल्यू सीएसआर विभाग अधिकारी सुधीर तेलंग, रसिक काळे, जि.प. सदस्य सभापती जागृती मानकर, जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, जि. प. सदस्य जनार्दन भस्मा, पंचायत समिती सदस्य विवेक म्हात्रे तसेच आरोग्य विभाग अधिकारी आणि सर्व संवर्गाचे कर्मचारी उपस्थित होते.

जनतेच्या आरोग्याची जबाबदारी हीच आमची प्राथमिकता असल्याचे सांगून सशक्त आणि निरोगी समाज घडवण्यासाठी ग्रामीण भागातील आरोग्यसेवा मजबूत करणे हेच आपलं उद्दिष्ट असल्याचे रायगड जिल्हा कृषी व पशुसंवर्धन तसेच दुग्ध शाळा समिती सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले. जिल्ह्यातील दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांना दर्जेदार व तत्पर आरोग्य सेवा मिळावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभागाच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन सर्व कर्मचाऱ्यांनी त्यापूर्ण करण्यावर भर द्यावा असे त्यांनी सांगितले. तसेच कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत त्यांनी वरिष्ठांशी किंवा माझ्याशी संवाद साधावा असे ते म्हणाले.

आरोग्य केंद्राच्या बांधकामामध्ये असणाऱ्या त्रुटींची पूर्तता पावसाळ्यापूर्वी करण्याचे आदेश रायगड जिल्हा कृषी व पशु संवर्धन तसेच दुग्ध शाळा समिती सभापती वैकुंठ पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. तसेच रिक्त पदे तात्काळ भरणे, औषधसाठा नियमित ठेवणे, आवश्यक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करणे व शासकीय आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीत फील्ड व्हिजिटवर विशेष भर देण्यात यावा, सर्व अधिकाऱ्यांनी ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांना नियमित भेट द्यावी. कम्युनिटी हेल्थ ऑफिसर, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी यांनी सातत्याने गृहभेटी द्याव्यात अशा सूचना दिल्या आहेत.

## रेवदंडा बागमळा येथे झाडावर वीज पडून आग

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन एप्रिल महिन्यातच ढगांचा गडगडाटा व विजेच्या लखलखाटासह लहरी पावसाने पहाटेस एट्री मारली, यावेळी चौल बागमळा येथे श्री शारदा पेट्रोल नजीक ताडाच्या झाडावर विज पडली, आणी ताडाच्या झाडाच्या शेंडयाचा भागाने चक्क आग लागून पेट घेतला.

ताडाच्या झाडाच्या शेंडयाच्या भागाजवळ विज पडून लागलेली आग हळूहळू चांगलीच पेट धरू लागली, या आगीच्या ज्वालासह ठिगंण्या ताडाच्या झाडाच्या सभोवताली पसरू लागल्या. पाउस असून देखील आगीच्या ज्वाला व ठिगण्या धगधडगत होत्या. दरम्यान परिसरात एकच घबराहट निर्माण झाली. शिवाय जवळच श्री शारदा पेट्रोल पंप व सिएनजी पंप असल्याने संभाव्य धोका निर्माण झाला. मात्र सुदैवाने कोणत्याही प्रकारची दुर्घना घडून आली नाही.

पहाटेच्या सुमारास रेवदंडा परिसरात ढगांचा गडगडाट व विजेचा लखलखाटासह पावसाने जोरदार एट्री केली. यावेळी ढगाचा गडगडाट व विजेचा लखलखाटाने स्थानिकांची झोप उडविली. अकस्मात पडलेल्या पावसाने आंबा उत्पादकांना धास्ती देवून गेला. तर अनेकांचा घरांना पावसाने गळती लागली.



## भाजपच्या अमित घाग यांना दैं. महासागरचा रायगड रत्न पुरस्कार

**धाटाव : प्रतिनिधी**

समाजसेवेचा ध्यास घेत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे. अमित हरिभाऊ घाग यांना दैनिक महासागर तर्फे देण्यात येणारा मानाचा 'रायगड रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासासह सातत्यपूर्ण सामाजिक, राजकीय व जनहिताच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करत त्यांनी कुरिअर सेवा, भाजी विक्री, हमाली अशी कामे करत आयुष्याची वाटचाल सुरू ठेवली. पुढे जाधव नर्सिंग होम येथे १३ वर्षे एक्स-रे टेक्निशियन म्हणून सेवा बजावत त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. संघर्षातून उभे राहत समाजकार्यास प्राधान्य देत सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप नेते सतीश धारप, रायगडचे जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील आणि आमदार रविशेठ पाटील यांचे मार्गदर्शन अमित घाग यांना सातत्याने लाभले असून, वरिष्ठ नेत्यांचा विश्वास आणि प्रेम त्यांना मिळाले आहे. भाजपाचे विविध उपक्रम, आंदोलने आणि जनसंपर्क मोहिमांमध्ये वरिष्ठांच्या सूचनांचे तंतोतंत पालन करून त्यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली आहे.

अन्यायाविरुद्ध लढा देताना खटलेही अंगावर घेतले, परंतु जनहिताचा मार्ग सोडला नाही.

## 'मुलींनी मोफत एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे'

**मुरुड : प्रतिनिधी**

बदलत्या जीवनशैलीमुळे देशात राज्यात कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कर्करोग होणारे रुग्ण वाढले आहेत.तरी मुलींनी शासनाच्या मोफत एचपीव्ही या लसीचा फायदा घ्यावा असे आवाहन मुरुड शहरातील डॉक्टर मयुर कल्याणी यांनी केले आहे. लहान मुलीना गर्भशाय सर्व्हिकल कर्करोग होत असल्याचे समोर आले आहे. ही चिंतेची बाब आहे.त्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारने कॅन्सरपासुन वाचविण्यासाठी चौदा वर्षांच्या पुढील पंधरा वर्षांच्या आतील मुलींना एचपीव्हीची लस मोफत देण्याचे ठरविले आहे.तरी पालकांनी न घाबरता आपल्या मुलीच्या आरोग्य विषयक सुरक्षिततेसाठी लस देणे गरजेचे आहे आपल्या मुलीचे आरोग्य सुदृढ ठेवणे महत्त्वाचे आहे तरी आपल्या ग्रामीण रुग्णालय , आरोग्य केंद्रात व खाजगी दवाखान्यात जाऊन ही लस घेऊन या मोठ्या भयानक आजारांपासून तिचे रक्षण करा.ही लस ग्रहण केल्यानंतर कोणतेही साईट इफेक्ट होणार नाहीत




### पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | मे. आकार कन्स्ट्रक्शन., प्लॉट नं.-१६, सेक्टर - ०६, श्री. कृपा हॉल जवळ, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), ता. पनवेल, जि. रायगड | ०३ गुलमोहर व ०१ उंबर अशी एकूण **०४ झाडे** तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **प्लॉट नं.- १६, सेक्टर - ०६, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), ता. पनवेल, जि. रायगड** येथे भूखंडाच्या आवारातील ०४ झाडे नवीन इमारत बांधकामात बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२६/प्र.क्र. ११४/१२५/२०२६**
**दिनांक :- २१/०४/२०२६**

**सही/-**
**उपायुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**


## साळाव-मुरुड रस्त्याची पहिल्याच पावसात दैना; चिखलाचे साम्राज्य

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात सध्या करोडो रुपये खर्च करून साळाव ते मुरुड हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यात येत आहे. सध्या खूप धीम्या गतीने या रस्त्याचे काम सुरू आहे. पावसाळा जवळ आला तरी रस्त्याच्या कामाला गती येत नसल्याने या रस्त्याचे पावसात काय होणार याचा प्रत्यय नुकताच थोड्या पडलेल्या पावसामुळे आला आहे.



आज सकाळी पहाटे ५ वाजताच्या सुमारास विजेच्या कडकडाटात सह पाऊस बरसला त्यामुळे साळाव मुरुड रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य झाले. रस्त्याच्या दोन्ही बाजूस पाणी साचून संपूर्ण रस्ता चिखलमय झाला होता. दुचाकी स्वार पुर्णतः गोंधळून गेले होते. रस्ता चिखलमय झाल्याने दुचाकी घसरु लागल्या होत्या. फार काळजीपूर्वक दुचाकी वाहन चालवत होते. जर थोड्या पावसामुळे ही परस्थिती झाली तर ज्यावेळी प्रत्यक्ष जून महिन्यात पाऊस पडेल त्यावेळी या संबंधित ठेकेदार याच्याकडे कोणते नियोजन असेल. असा प्रश्न असंख्य प्रवासी वर्गाला पडला आहे. अजून काही ठिकाणी मोऱ्या बनवण्याचे काम सुरू आहे. प्रत्यक्षात हा रस्ता कधी होणार हा प्रश्न प्रत्येकाला पडला आहे.

## गांधी शांती परीक्षेत जिल्हा कारागृहातील २३ महिला व पुरुष बंद्यांचा सहभाग



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग जिल्हा कारागृहात दाखल बंद्यांमध्ये नैतिक मुल्यांचा विकास आणि हिंसामुक्त समाज घडविण्यासाठी मुंबई सर्वोदय मंडळ, मुंबई या सामाजिक संस्थेच्या वतीने कारागृहातील बंद्यांकरीता आयोजित करण्यात आलेल्या गांधी शांती परिक्षेत जिल्हा कारागृहातील २३ महिला व पुरुष बंद्यांनी सहभाग घेतला असल्याची माहिती जिल्हा कारागृह अधीक्षक विशाल बांदल यांनी दिली आहे.

संस्थेचे स्वयंसेवक प्रेमशंकर तिवारी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शांततापूर्ण जगाची निर्मिती करण्यासाठी तसेच भावी पिढीसाठी बंद्यांमध्ये प्रेम, बंधुत्व, मैत्रीभाव, सहिष्णुता, सेवाभाव, सत्य, अहिंसा आणि शांततेचे बिज रुजवुन शांतिमय जिवन जगण्याकरीता बंद्यांना प्रवृत्त करण्यासाठी गांधी शांती परिक्षेचे आयोजन करीत असल्याचे सांगितले. तसेच महात्मा गांधीजींची आत्मकथा वाचून बंद्यांचे हृदय परिवर्तन व्हावे, त्यांना भावी जीवन जगण्याची प्रेरणा मिळावी व बंद्यांनी सत्य व अहिंसेच्या मार्गावर जावून त्यांचे विचार परिवर्तन होण्यास मदत करण्याच्या उद्देशाने या संस्थेमार्फत कारागृह ग्रंथालयात बंद्यांना वाचण्याकरीता गांधी विचारांची पुस्तके देण्यात आली आहेत.

तसेच गांधी शांती परिक्षेत अलिबाग जिल्हा कारागृहातील २३ महिला व पुरुष बंद्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व बंद्यांना मुंबई सर्वोदय मंडळ यांच्यावतीने खादीचे टॉवेल, हातरुमाल व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.हा उपक्रम अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे डॉ.सुहास वारके व विशेष कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.


### जाहीर नोटीस
**(हक्कसोड पत्राबाबत)**

**सिडको/भूसंपादन/१४२_NM_B/२०२६/३५९७** **दिनांक : २०.०४.२०२६**

जाहीर नोटीसव्दारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांचेमार्फत मुंबई नवी मुंबई प्रकल्पाकरीता मौजे करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिनीचा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ नुसार व २२.५ टक्के विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत जमीनधारकांच्या ऐच्छिक संमतीने अंतिम संमती निवाडा घोषित केला आहे. त्यानुसार सिडको महामंडळाच्या स्तरावर संगणकीय सोडतीद्वारे पात्रताधारकांस 'भूखंड इरादित करण्यात आला आहे व इरादापत्र निर्गमित करण्यात आले आहे. संपादित जमीन व इरादित भूखंडाचा तपशील खालीलप्रमाणे आहेः-

| संचिका क्रमांक | निवाडा क्रमांक | सव्हे नंबर/ हिस्सा नंबर | संपादित क्षेत्र क्षेत्र (हे. आर) | भूखंड पात्रता (चौ.मी) | जमीनधारक | इरादित भूखंडाचा तपशिल: नोड | सेक्टर क्रमांक | भूखंड क्रमांक | क्षेत्र क्षेत्र (चौ.मी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संचिका क्र. १४२/ NM_B | करंजाडे प्रकरणी क्र.३२ दि. ०२/११/ २०२१ | ६७/४ अ पे | ४-६४-०० | १५०३० | १) इस्माईल ईब्राहिम धारीवाला, २) अजीज इस्माईल धारीवाला, ३) इब्राहीम ईस्माईल धारीवाला, ४) तसनीम इब्राहीम धारीवाला, ५) नफिसा शब्बीर जामनगरवाला, ६) यहिया इब्राहीम धारीवाला, ७) सारा बद्रुद्दीन धारीवाला उर्फ सारा मोईन उनवाला, ८) झकीया बद्रुद्दीन धारीवाला, ९) कुतुब बद्रुद्दीन धारीवाला १०) मोहसिन इब्राहीम धारीवाला | पुष्पक नोड | २९ | ०३ | १५०३० चौ.मी |
| | | ६७/४ ब पे | ३-४१-०० | | | | | | |
| | | ६७/५ | ०-६७-०० | | | | | | |
| | | ६७/६ पे | ०२-८२-०० | | | | | | |

०२. नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) नियमावली, २००८ च्या नियमावली १०अ मधील तरतुदीनुसार भूखंडधारकांनी इरादित भूखंडातील त्यांच्या हिस्स्याचे क्षेत्र नोंदणीकृत हक्कसोड पत्राद्वारे हस्तांतरित केले आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहेः-

| नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्रमांक व दिनांक | हक्कसोड पत्र लिहून देणार | हक्कसोड पत्र लिहून घेणार | भूखंडाचा तपशील |
|---|---|---|---|
| उरन-७८३-२०२६, दि. ०२.०२.२०२६ | नफिसा शब्बीर जामनगरवाला | इब्राहीम ईस्माईल धारीवाला | सेक्टर-२९ , भूखंड क्र. ०३ क्षेत्र-१५०३० चौ.मी. (त्याचा असणारा अविभाज्य क्षेत्राचा हिस्सा) |

०३. नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) नियमावली, २००८ च्या नियमावली १०अ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत नोंदणीकृत हक्कसोड पत्राबाबत हरकत अथवा तक्रार असल्यास, त्याबाबत बाधीत व्यक्तींनी त्यांची लेखी हरकत अथवा तक्रार सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह, सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांच्या आत **मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात दाखल करावी. तसेच लेखी हरकत अथवा तक्रार दाखल करणाऱ्या व्यक्तींनी, हरकत अथवा तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून ६० (साठ) दिवसांच्या आत सदर हरकत व तक्रार यांच्या पृष्ठ्यर्थ सक्षम न्यायालयाने पारित केलेल्या अंतरित अथवा अंतिम आदेशाच्या प्रमाणित प्रति सादर कराव्यात.

०४. सदर प्रकरणी विहीत कालावधीमध्ये व वाजवी पुरावा असणारी लेखी हरकत अथवा तक्रार प्राप्त न झाल्यास, सदर नोंदणीकृत हक्कसोड पत्रांच्या अनुषंगाने सिडको महामंडळाच्या स्तरावर पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

०५. सदर जाहीर नोटीस स्थानिक वर्तमानपत्रासह **ग्रामपंचायत करंजाडे, तलाठी करंजाडे, तहसिलदार पनवेल** व सिडको कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**सही/-**
**(रामदास जगताप)**
**अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य**
**भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**



# ADMISSION
## ACADEMIC YEAR 2026-2027

**JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S INSTITUTE OF INDUSTRIAL SAFETY**

(INSTITUTE CODE: 0358)

(Affiliated to Maharashtra State Board of Technical Education Mumbai)

**APPLICATIONS ARE INVITED FOR "ADVANCED DIPLOMA IN INDUSTRIAL SAFETY"**

(DURATION - ONE YEAR ( TWO SEMESTERS) - NUMBER OF SEATS 60)

Admissions are on "First - Come- First Basis"

**ELIGIBILITY–**Any Science Graduate/Graduate in Medical Science/BDS/Graduate in Occupational Therapy (OT), Graduate in Physiotherapy (PT) /Graduate in Veterinary Science or

Degree/Diploma in Engineering/Technology or its equivalent from a recognized Statutory University/ Board or

Advanced Diploma in Fire Safety and Industrial Environmental Engineering (FA) / Post Diploma in Fire Engineering (FI) / Diploma in Fire Service Engineering (FR) / Advanced Diploma in Fire Safety Engineering (FS) / Advanced Diploma in Industrial Safety & Security Management (FF) of MSBTE.

**COMMENCEMENT OF THE COURSE JULY 2026**

Prospectus and Application forms for the above course can be obtained between 11.00 am and 05.00 pm. from Institute office.

C/o, CKT High School & Jr. College, Plot No. 08, J. A. Bhagat Marg, Sector - 14, CIDCO Colony, Opp. Railway Station, New Panvel (E) - 410206, Dist. – Raigad.

**9920053204 / 9930651467 / 7208215941**



### कागदपत्रे हरविलेबाबत

मी,श्री.अरविंद लक्ष्मणराव रामरामे , पत्ता : रा. रॉयल गॅलक्सी को. ऑप. सोसायटी लि. प्लॉट नं १०१, सेक्टर १० खारघर नवी मुंबई

माझेकडून १७/०४/२०२६ रोजी तक्का ते पनवेल प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ०७३३/२०२६ दिनांक. १९/०४/२०२६ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. घराचे मुळ दस्तावेज ३) शेअर सर्टिफिकेट

२. रजीस्ट्रेशन रिसीट ४) बिल्डर पजेशन लेटर ५) बिल्डर पेमेंट रिसीट

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९८६९०३६२०७ वर संपर्क साधावा.

**दिनांक :- २१/०४/२०२६**

**सही/-**
**अरविंद लक्ष्मणराव रामरामे**

# ऐरोली, तुर्भेत होणार सुसज्ज ट्रक टर्मिनल

## एमआयडीसीतील अवजड वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न सुटणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आशिया खंडातील सर्वात मोठा औद्योगिक पट्टा अशी ओळख असणाऱ्या ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील अवजड वाहनांमुळे होणारी कोंडी सोडविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) युद्धपातळीवर उपाय आखण्यास सुरुवात केली आहे.



इतक्या मोठ्या औद्योगिक पट्ट्यात ये-जा करणारी अवजड वाहने उभी करण्यासाठी अजूनही पुरेशी व्यवस्था नाही. येथील उद्योजकांनी आग्रह धरल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागात सुसज्ज अशा ट्रक टर्मिनलची उभारणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ऐरोली येथील इलठणपाडा आणि तुर्भे एमआयडीसी भागात सुसज्ज असे ट्रक टर्मिनल लवकरच सुरू केले जाणार आहे.

ठाणे-बेलापूर रस्त्याच्या पूर्व बाजूस २३३३.२७ हेक्टर इतक्या विस्तीर्ण क्षेत्रात एमआयडीसीने ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे. या क्षेत्रात ए,सी,डी,आर,के आणि ई-एल अशा वेगवेगळ्या ब्लॉकचा समावेश करण्यात आला आहे. या औद्योगिक क्षेत्रात सहा हजारांहून अधिक लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांची उभारणी झाली आहे.

तसेच येत्या काळात याच भागात आणखी नवे उद्योग उभे रहात आहेत तसेच विस्तारत आहेत. रासायनिक, पेट्रोकेमिकल्स, औषध निर्माण अभियांत्रिकी, शीतगृह, माहिती तंत्रज्ञान यासारखे वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग येथे कार्यरत आहेत. या औद्योगिक क्षेत्रात जवाहरलाल नेहरू बंदर, पुणे, मुंबई तसेच देशातील वेगवेगळ्या भागातून माल वाहतूक करणाऱ्या जड अवजड वाहनांची ये-जा सुरू असते. यातील बरीचशी वाहने ही याच भागात मुक्कामासाठी असतात.

इतक्या मोठया औद्योगिक पट्ट्यात एमआयडीसीने अजूनही ट्रक टर्मिनल विकसित केलेले नाही. त्यामुळे या भागात येणारी अवजड वाहने ही रस्त्याच्या दुतर्फा उभी केली जातात. त्यामुळे हा संपूर्ण पट्टा वारंवार वाहतूक कोंडीत सापडलेला दिसतो.

देशातील सर्वात मोठ्या अशा या औद्योगिक पट्ट्यात येत्या काळातही अवजड वाहनांची ये-जा वाढेल अशीच चिन्हे आहेत. हा भाग नवी मुंबई तसेच आसपासच्या शहरी भागांनाही लागून आहे. त्यामुळे या भागात काम करण्यास येणारे कामगार तसेच नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली यासारख्या भागातून ये-जा करणाऱ्या हलक्या वाहनांची संख्याही येथे बरीच मोठी आहे. दुतर्फा उभी रहाणारी अवजड वाहने तसेच दररोज या भागात वाढणाऱ्या हलक्या वाहनांमुळे येथील वाहतुकीचे तीनतेरा वाजण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. हे लक्षात घेऊन यासंबंधी एमआयडीसी प्रशासन आणि स्थानिक वाहतूक पोलिसांनी तातडीने उपायांची आखणी सुरू केली आहे.

ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयातील उद्योजकांच्या वेगवेगळ्या प्रश्नांवर मध्यंतरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत उद्योजकांच्या संघटनेने ट्रक टर्मिनल अभावी या भागात निर्माण होत असलेल्या वाहतुकीच्या समस्यांची माहिती दिली होती. त्यावर अवजड वाहने उभी करण्यासाठी तातडीने व्यवस्था उभी करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले होते.

एमआयडीसी प्रशासनाने या आदेशाची वेगाने अंमलबजावणी सुरू केली असून दिघा-ऐरोली भागातील इलठणपाडा आणि तुर्भे येथील डी ब्लॉकमध्ये ट्रक टर्मिनल उभारण्याची कामे अंतिम टप्प्यात आहेत, अशी माहिती एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारसू यांनी दिली.

या दोन महत्वाच्या टर्मिनलमुळे एमआयडीसी भागात अवजड वाहनांच्या थांब्याचा मोठा प्रश्न मार्गी लागेल, असा दावा ठाणे-बेलापूर औद्योगिक संघटनेने केला आहे.

### प्रस्तावाला आधीच मान्यता

इलठणपाडा येथे टर्मिनस उभारणीसाठी ११० कोटी तर तुर्भे येथील डी ब्लॉकमध्ये हे काम करण्यासाठी ९५ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला यापूर्वीच मान्यता दिली आहे. यापैकी तुर्भे येथील ट्रक टर्मिनसचे काम अंतिम पूर्ण झाले असून स्थानिक वाहतूक पोलिसांनी ते सुरू करण्याची मागणी एमआयडीसीकडे केली आहे. हे टर्मिनस लवकरच सुरू केले जाईल, असे एमआयडीसीने स्पष्ट केले आहे.

# कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळाले दोन वैद्यकीय अधिकारी

## शासकीय यंत्रणेने घेतली दखल

**उरण : बातमीदार**

डॉक्टर आणि अन्य कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे उरण तालुक्यातील कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रावर अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. यावर विविध राजकीय प्रतिनिधी, सामाजिक संस्था संघटना, विविध वृत्तपत्रांनी आवाज उठविल्यानंतर आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली. त्वरित या समस्याची दखल घेऊन तातडीने रुग्णालयात दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णांची हेळसांड थांबणार असून त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

उरण तालुक्यातील दोन लाख लोकसंख्येसाठी येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय व कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र एकमेव आधार आहे. उरणच्या पूर्व भागातील सुमारे एक लाख गोरगरीब नागरिक उपचारासाठी कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राकडे धाव घेतात. या केंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी ३, महिला आरोग्य परिचारिका २, आरोग्य सेविका २६, शिपाई २ आदी ३३ पदे मंजूर आहेत. यामध्ये आवश्यकता असलेल्या तीन सुरक्षारक्षकांचा समावेश नाही.

यापैकी वैद्यकीय अधिकारी २, महिला आरोग्य परिचारिका १, आरोग्य सेविका २२, शिपाई २ अशी तब्बल



२७ पदे रिक्त होती. अवघ्या तीन आरोग्य सेविकांवर गर्भवती, बाळंतीण महिला, नवजात बालकांची तपासणी आणि इतर कामांचा भार आला होता. याबाबत आवाज उठविताच कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रच्या बाबतीत आरोग्य विभागाने लगेच सूत्र हलविले.

आरोग्य विभागाने समस्याची त्वरित दखल घेऊन दोन महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली. रायगड जिल्हा आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी डॉ. कोमल डकेवाड व डॉ. मानसी वावेकर यांची नियुक्ती केली असल्याची माहिती उरण पंचायत समितीचे तालुका आरोग्य अधिकारी वंदन कुमार यांनी दिली. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुयांमुळे ग्रामीण भागातील रुग्णांना आता दिलासा मिळाला आहे. इतर रिक्त पदेही त्वरित भरण्यात यावी व जनतेला चांगल्या सेवा सुविधा द्याव्यात, अशी मागणी जनतेने केली आहे.

# आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पनवेल मनपा सदैव पाठीशी -महापौर नितीन पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना तसेच कर्मचाऱ्यांना उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी येणाऱ्या काळात मी आणि माझे सर्व सहकारी एकत्रितपणे प्रयत्न करणार असून, महापालिकेचे आरोग्य कर्मचारी ज्या निष्ठेने सेवा देत आहेत, त्यांच्या पाठीशी प्रशासन ठामपणे उभे असल्याचे प्रतिपादन महापौर नितीन पाटील यांनी केले.



म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा भव्य मेळावा मंगळवारी शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. या मेळाव्याला महापौर नितीन पाटील आणि सभागृह नेते अ‍ॅड.प्रकाश बिनेदार यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महापौरांनी कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबतचा प्रश्न लवकरच मार्गी लावण्याचे तसेच कामाच्या तासांसंदर्भात तातडीने बैठक घेऊन सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. कामगारांच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करत राहू, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांनी कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, आरोग्य कर्मचारी ज्याप्रमाणे नागरिकांना सेवा देण्याचे प्रामाणिक काम करत आहेत, त्याचप्रमाणे त्यांचे हित जोपासणे ही सत्ताधारी म्हणून आमची जबाबदारी आहे आणि ती आम्ही नक्कीच पार पाडू असा विश्वास व्यक्त केला.

या मेळाव्याला म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश ठाकूर, अनिल जाधव, डॉ. भक्तराज भोईटे, दत्तगुरु म्हात्रे, डॉक्टर सुरेश पंडीत, संगीता सोळंकी, महेंद्र गायकवाड, अनिकेत जाधव, अजिंक्य दळवी, विश्राम म्हात्रे आदी उपस्थित होते.

# सायबर जागरूकतेसह हळदीकुंकू समारंभ

## कमळ महिला पतसंस्थेतर्फे अनोखा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कमळ महिला नागरी सहकारी पतसंस्था (म.) पनवेल ही संस्था महिलांसाठी नेहमीच विविध उपक्रम राबवित असते. यावर्षीही चैत्रगौरी निमित हळदीकुंकू समारंभ शनिवार, १८ एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम पतसंस्थेच्या कर्मचारी प्रशिक्षण केंद्र, पहिला मजला, जयभारत नाका, पनवेल येथे झाला.



समारंभाच्या सुरुवातीला संस्थेच्या उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर यांनी उपस्थित महिला सभासदांचे स्वागत केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून दक्षता समिती सदस्य तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका मॅडम आणि सहाय्यक पोलीस सचिन पोवार उपस्थित होते.

संस्थेच्या उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून संस्थेच्या आर्थिक स्थितीची सविस्तर माहिती दिली. व विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच चैत्रगौरी हळदीकुंकू समारंभाची महती याबाबत महिलांना मार्गदर्शन केले व महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर प्रमुख पाहणे सारिका मॅडम व सचिन पोवार यांनी उपस्थित महिला सभासदांना सायबर गुन्हे आणि सध्याच्या परिस्थितीबाबत मार्गदर्शन केले. आणि त्यांनी केलेले मार्गदर्शन सर्व महिलांना खरोखरच मोलाचे ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ उपस्थित महिलांना झाला.

कार्यक्रमात महिलांसाठी मनोरंजनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यानंतर सर्व उपस्थित महिला सभासदांना हळदीकुंकू वाण दिले. यावेळी चांगल्या प्रकारे महिला सभासदांनी उपस्थिती दर्शवली.

या प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा मालती आंग्रे, उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर, संचालिका चित्रा मानकामे, मनीषा विसपुते, सुषमा जांभळे, निर्मला म्हात्रे, अर्चना गायकवाड तसेच संस्थेच्या महिला कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. संस्थेचे संस्थापक तथा तज संचालक शशिकांत बांदोडकर यांच्या मार्गदर्शनामुळे हा हळदीकुंकू समारंभ यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रम आनंददायी आणि उत्साही वातावरणात झाला.

# छबी सेवा फाउंडेशनच्या शाखेचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत 'छबी सेवा फाउंडेशन' व 'छबी विश्व फाउंडेशन' यांच्या नवीन मध्यवर्ती कार्यालयाचा ऐरोली येथे थाटात शुभारंभ झाला. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिराला शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध तपासण्या करून घेतल्या.



या कार्यक्रमाला आयुष्मान मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश सदाशिव शेटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महापौर सुजाता पाटील, नगरसेवक सुरज पाटील, ममीत चौगुले, राहुल पाठारे, पार्थ रॉय यांच्यासह राजकीय, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान डॉ. शेटे यांनी केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत आरोग्य योजनेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आयुष्मान कार्डच्या माध्यमातून नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळू शकतात, असे सांगत त्यांनी सर्वांनी ही योजना तातडीने लाभ घ्यावा, असे आवाहन केले. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी 'वंदन कार्ड'च्या माध्यमातून १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी दिली. आयोजित आरोग्य शिबिरात मुख कर्करोग तपासणी, दंत चिकित्सा, नेत्र तपासणी, हाडांचे विकार आणि सर्वसाधारण आरोग्य तपासणी अशा विविध सेवा पूर्णपणे मोफत देण्यात आल्या. ऐरोली आणि परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावर स्वागत केले.

यावेळी डॉ. शेटे यांनी पर्यावरण संरक्षणाचाही संदेश देत प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी फाउंडेशनचे डॉ. विश्वनाथ गारगोटे यांनी उपस्थित मान्यवर व नागरिकांचे आभार मानले.

# उरण तालुक्यासाठी ४२५ मॅट्रिक टन युरिया रासायनिक खताचे नियोजन

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांना आगामी हंगामात रासायनिक खतांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने व्यापक नियोजन केले आहे. शासनाकडून उरण तालुक्यासाठी एकूण ४२५ मेट्रिक टन युरिया रासायनिक खताचे नियोजन करण्यात आले असून एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत नियोजित साठ्यानुसार खत विक्रेत्यांना टप्प्याटप्प्याने पुरवठा केला जाणार आहे.



हंगामाच्या काळात खतांची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी तालुक्यात २५ मेट्रिक टन युरिया खताचा संरक्षित साठा ठेवण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. या नियोजनामुळे अनुदानित खते उपलब्ध राहतील आणि शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. दरम्यान, रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत बाबींचे उल्लंघन केल्यास संबंधितावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. तालुक्यासाठी उपलब्ध असलेले मंजूर वाटप आणि साठा लक्षात घेता खतांची टंचाई निर्माण होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आलेय.

शेतकऱ्यांनी घाईघाईने खत खरेदी करू नये व खताची विक्री E-pos प्रणालीद्वारे होत असल्याने खते खरेदी करताना शेतकऱ्यांनी सोबत आधारकार्ड ठेवावे असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच चालू हंगामात खते व बियाण्यांचा पुरवठा सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्याबाबत तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्र धारकांना सूचना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तालुका कृषी अधिकारी,उरण व कृषी अधिकारी गुण नियंत्रण यांनी दिलेल्या आहेत व कुठेही खत विक्रीत 'लिंकिंग करून शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्यास तत्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उरण तालुका पोलीस मित्र समिती अध्यक्षपदी महेश वर्तक



**उरण : बातमीदार**

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ (संचालित) पोलीस मित्र समितीच्या उरण तालुका अध्यक्षपदी महेश यादव वर्तक यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

ही नियुक्ती संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, महासचिव विनोद पवार, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार, राष्ट्रीय संघटक निलेश ठाकरे, प्रमुख सल्लागार सुभाष बिंदवाल, राष्ट्रीय उपाध्यक्ष ज्ञानेश्वर बागुल आणि शंकरसिंग ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. तसेच राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ, राज्य कार्याध्यक्ष नरेंद्र सोनार, राज्य उपाध्यक्ष मोरोती शिकारे, मारुती जाधव, गोपालराव लाड, विनायक माळी, राज्य संघटक दत्ता मुजमुले, राज्य सचिव प्रितम चौहाण, राज्य सहसंघटक शेखर सोनवणे, अन्याय-अत्याचार निवारण समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ता पाटील व राज्य कार्याध्यक्षा प्रमिला अडांगळे यांच्या सहमतीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

महेश वर्तक हे सामाजिक कार्यकर्ते असून त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. तळागाळातील जनतेच्या अनेक समस्या ते सोडवत असतात.

# साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

वाशी सेक्टर १ येथील श्री साईबाबा मंदिराचा ३३वा वर्धापन दिन उत्सव यंदाही भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. हा उत्सव २३ व २४ एप्रिल रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांनी पार पडणार आहे.

उत्सवाची सुरुवात गुरुवारी श्री साईबाबांच्या लघु रुद्राभिषेकाने होणार असून त्यानंतर श्री गणेश अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तन करण्यात येणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता श्री साईबाबांच्या पोथी व चरणपादुकांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या पालखी मिरवणुकीच्या शुभारंभासाठी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पालखी मिरवणुकीनंतर हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने भक्तांच्या उपस्थितीची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. शुक्रवारी सायंकाळी ८ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंदिर प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

# पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी एमएच ४६ डीएच नवीन मालिका

## पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी एमएच ४६ डीएच ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. यासाठी ज्यांना दुचाकी वाहनांकरिता आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरून हवे असतील त्यांनी २३ एप्रिल २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते दुपारी २.३० या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खाजगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिहवन अधिकारी पनवेल यांनी केले आहे.


एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन २४ एप्रिल २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी २.३० वाजेपूर्वी त्यांच्या इच्छेप्रमाणे जास्तीच्या रक्कमेचा धनाकर्ष (DD) बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा. या अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

अर्जदार यांना सर्व साधारण सूचना पुढीलप्रमाणे :-सदर धनाकर्ष (DD) RTO PANVEL यांच्या नांवे नॅशनलाईज्ड / शेड्युल्ड बँकेचा असावा, तो दोन महिन्यांपेक्षा जास्त जुना नसावा. अर्जदाराने अर्जासोबत पॅनकार्ड, ई-आधारकार्ड तसेच पत्त्याचा पुरावा साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावाकरिता जमा करण्यात येणारा धनाकर्ष (DD) या सिलबंद पाकीटात जमा करावा. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकार जमा होईल.

आकर्षक क्रमांकासाठी आगाऊ स्वरुपात अर्ज स्विकारत असून चालू मालिका संपल्याशिवाय नवीन मालिका सुरू होणार नाही. तसेच आगाऊ प्रक्रियेमध्ये स्विकारलेल्या अर्जाच्या धनाकर्षण च्या पावत्या, जुन्या मालिकेतील पूर्ण नंबर संपल्याशिवाय नवीन मालिकेतील पावत्या जारी केल्या जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी. अर्जदारांना https://fancy.parivahan.gov.in, या संकेत स्थलाद्वारे याबाबतची अधिक माहिती उपलब्ध आहे.

# उमटे धरणाच्या कामासाठी निधीची मागणी

## जि.प.अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांना निवेदन



**पाली : प्रतिनिधी**

उमटे धरणाच्या गाळाचा व शुद्ध पाण्याच्या प्रश्नांवर योग्य व जलद उपाययोजनेसाठी उमटे धरण संघर्ष ग्रुपने आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांची उमटे धरण संघर्ष ग्रुपचे ॲड. राकेश पाटील यांनी जिल्हा परिषदेचे सदस्य डॉ. सचिन राऊळ यांच्या समवेत भेट घेतली, उमटे धरण संघर्ष ग्रुपने निवेदनही दिले.

निवेदनात म्हटले आहे की, आपल्या रायगड जिल्हा परिषदेकडे सध्या १५ व्या वित्त आयोगाचा ५० कोटी रुपयांचा निधी पडून आहे. सदरच्या निधी पैकी आपण उमटे धरणाचा गाळ व शुध्द पाण्यासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा, उमटे धरण हे आपल्याच जिल्हा परिषदेच्या मालकीचे आहे.

शासकीय अधिकारी धरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नापेक्षा अजून कोणता मोठा प्रश्न असेल? असे वाटत नाही. आपणांस सदरच्या निवेदनाव्दारे विनंती करतो की रा.जि.प. वार्षिक अर्थसंकल्प १७५ कोटीचा मांडू शकते. त्यामध्ये पाच कोटींचा निधी कठीण नाही.

मागील १२ वर्षांपासून अलिबाग तालुक्यामधील उमटे धरणाच्या गाळाचा व अशुध्द माती मिश्रीत पाण्याचा प्रश्न पेटला आहे. ३३ आदिवासी वाड्या व ४७ गावातील नागरीकांची तहान भागविणारे उमटे धरण गाळाने भरले आहे. सध्या चार दिवसांआड नागरीकांना मातीमिश्रित गढूळ पाणी पाजण्याचे काम आपली जिल्हा परिषद करीत आहे. सन २०२२ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगांव यांनी नेमणूक केलेल्या तांत्रिक सल्लागारामार्फत २१५ कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता, परंतु तो प्रस्ताव आजही धूळखात पडला आहे. अशुध्द पाणी शुध्द करण्यासाठी जिल्हा परिषदेने ४.५ दलली क्षमतेचे जलशुध्दीकरण प्लांट बांधण्यात आला, परंतु फिल्टर प्लान्ट मागील ५ वर्षांपासून बंद आहे.

आपल्या जिल्हा परिषदेकडे सध्या १५ व्या वित्त आयोगाचा ५० कोटी रुपयांचा निधी पडून आहे. सदरच्या निधी पैकी आपण उमटे धरणाचा गाळ व शुध्द पाण्यासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा, उमटे धरण हे आपल्याच जिल्हा परिषदेच्या मालकीचे आहे. शासकीय अधिकारी धरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नापेक्षा अजून कोणता मोठा प्रश्न असेल? असे वाटत नाही.

या निवेदनाव्दारे विनंती करतो की रा.जि.प. वार्षिक अर्थसंकल्प १७५ कोटीचा मांडू शकते. त्यामध्ये ५ कोटींचा निधी कठीण नाही? त्यामुळे उमटे धरणाच्या गाळासाठी आपण ५ कोटीच्या निधीची तरतूद करुन उमटे धरणाचा गाळ काढण्यात तात्काळ सुरुवात करावी ही मागणी उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगड यांच्या वतीने जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे,

> **रायगड जिल्हा परिषदेने या वर्षीचा १७५ कोटींचा अर्थसंकल्प मांडला असून १५व्या वित्त आयोगाचा ५०कोटीचा निधी आजही जिल्हा परिषदेकडे पडून आहे. उमटे धरणामधली तुटलेली जॅकवेल व साचलेला गाळकाढण्यासाठी ५ कोटींच्या निधीची तरतूद करण्यास जिल्हा परिषदेला काहीही कठीण नसून गाळ काढणे सोप्पे होईल. उगाचच १५ते २०कोटींचा निधी जाहीर करून पुन्हा तोंडाला पाने पुसण्यासारखं होईल,**
>
> **–ॲड. राकेश पाटील, उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगड**

# एक्सप्रेस, स्पेशल गाड्यांना थांबा द्या!



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे परिसरातील प्रवाशांच्या सोयीसाठी नागोठणे प्रवासी संघटनाने महत्त्वपूर्ण मागण्या पुढे केल्या आहेत. दिवासावंतवाडी एक्सप्रेस तसेच गणपती स्पेशल आणि हॉलिडे स्पेशल गाड्यांना नागोठणे स्थानकावर थांबा देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

नागोठणे आणि परिसरातील सुमारे १०४ गावांतील नागरिकांना केवळ सहा गाड्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. रोहादिवा मार्गावरील पॅसेंजर गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी असल्याने प्रवाशांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर संघटनेचे अध्यक्ष हृषीकेश भोय, सल्लागार ॲड. महेश पवार, सेक्रेटरी संदेश सुकाळे आणि सदस्य किसन तांडेल यांनी मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील धनराज नीला यांची छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे भेट घेऊन निवेदन सादर केले.

आपल्या निवेदनात नागोठणे प्रवासी संघटनेने म्हटले आहे की, दिवासावंतवाडी पॅसेंजर (क्र. १०१०५–१०१०६) गाडीचा पूर्वीप्रमाणे नागोठणे येथे थांबा सुरू करावा, गणपती स्पेशल व हॉलिडे स्पेशल गाड्यांना नागोठणे स्थानकावर थांबा द्यावा, दिवापेण (६१०१९–६१०२०) गाडीचा नागोठणेपर्यंत विस्तार करावा, प्लॅटफॉर्म क्रमांक २ व ३ ची उंची वाढवून प्रवाशांच्या सुरक्षेची हमी द्यावी, आरक्षित तिकीट सुविधा नागोठणे स्थानकावर उपलब्ध करावी, संघटनेच्या म्हणण्यानुसार, कार्यक्षम वाहतूक ही विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असून, दररोज १०० ते १७० किमी प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी रेल्वे सेवा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. या सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती नागोठणे प्रवासी संघटनेने संघटनेने दिली असून, लवकरच योग्य तो निर्णय होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# अलिबागमध्ये टॅक्स कन्सल्टंट व्यवसायातील अडचणींची चर्चा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड टॅक्स कन्सल्टंट असोसिएशन (आरटीसीए) आणि अलिबागमधील टॅक्स कन्सल्टंट यांच्या संयुक्त विद्याने अलिबाग येथे टॅक्स कन्सल्टंटची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत टॅक्स कन्सल्टंट व्यवसायातील अडीअडचणी, त्यावरील उपाययोजना आणि व्यवसाय वृद्धिंगत होण्याबाबत चर्चा करण्यात आली.

या सभेला अलिबागमधील टॅक्स कन्सल्टंट व्यावसायिकांनी चांगला प्रतिसाद दिला. ज्येष्ठ सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली सभासदांचे ज्ञानवर्धन करण्यासाठी, तसेच आर्थिक उन्नती आणि उत्तम स्वास्थ्य प्राप्त करण्यासाठी संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा सचिव कौस्तुभ जोशी यांनी मांडला.भविष्यात स्वराज्याच्या या राजधानीला ज्ञानाचा अभेद्य किल्ला बनवण्यात.असे प्रतिपादन अध्यक्ष जनार्दन तांडेल यांनी केले. आरटीसीए चे उद्दिष्ट आणि ध्येय सभासदांच्या गरजांशी सांगड घालणारे आहे असे संस्थेचे उपाध्यक्ष राजेश जगे यांनी सांगितले. सभासद, विद्यार्थी आणि व्यावसायिकांचे ज्ञानवर्धन करण्यासाठी संघटनेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली.

यापुढील सर्व उपक्रम राबविताना, अलिबागकरांचा सक्रिय सहभाग नोंदविण्यात येईल, अशी ग्वाही संस्थेचे जिल्हा समन्वयक संजय राऊत यांनी दिली. या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजन करणे करिता अलिबाग तालुका समन्वयक स्वाती धर्माधिकारी, श्वेता घरत, वैभव जोशी आणि प्रणय नाईक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'महात्मा बसवेश्वरांचे विचार प्रत्येकाने आचरणात आणावेत'



**रोहा : प्रतिनिधी**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचे विचार जगभर पसरले आहे. अशा महान संत जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचे विचार प्रत्येकाने आचरणात आणण्याची आवश्यकता असल्याचे पंचक्रोशी जंगम समाज अध्यक्ष लक्ष्मणस्वामी जंगम यांनी राजेंद्रस्वामी जंगम यांच्या निवासस्थानी आयोजित महात्मा बसवेश्वर जयंती निमित्ताने मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

या कार्यक्रमास उपाध्यक्ष मनोहर स्वामी जंगम, राष्ट्रीय जंगम संघटना रायगड समन्वयक विनोदस्वामी जंगम, सहसचिव वीरेंद्रस्वामी जंगम खजिनदार अरुणस्वामी जंगम, सह खजिनदार किरणस्वामी जंगम, प्रकाशस्वामी जंगम, श्रीकांतस्वामी जंगम, दिगंबरस्वामी जंगम, प्रमोदस्वामी जंगम, ज्येष्ठ महादेवस्वामी जंगम, काशिनाथस्वामी जंगम, मारुती स्वामी, निलेश स्वामी, सागरस्वामी, रमेशस्वामी, कृष्णास्वामी, रघुनाथस्वामी, महिला मंडळ अध्यक्ष प्रिया जंगम, सुखदा जंगम, अस्मिता जंगम, विद्या जंगम, रूपाली जंगम, विजया सरसंबे, प्रगती जंगम आदी उपस्थित होते.

यावेळी पत्रकार महादेव सरसंबे यांनी जगज्योती महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात सामाजिक समतेचा हुंकार दिला. समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड दूर करीत सशक्त असा लिंगायत समाज उभा केला. काय कवे कैलास या त्यांच्या विचाराने समाज घडवला असे सांगितले. यावेळी विनोदस्वामी जंगम यांनी लिंगायत समाजाला भक्ती सांगत कर्माचे महत्त्व सांगितले. १२ शतकात सामाजिक क्रांती महात्मा बसवेश्वर यांनी केली असल्याचे सांगितले. यावेळी प्रिया जंगम यांनी महिलांना समान संधी श्री महात्मा बसवेश्वर यांच्यामुळे मिळाली, असे सांगितले.

कार्यक्रमाची प्रास्ताविक पंचक्रोशी जंगम समाज यांनी गेल्या वर्षभरात विद्यार्थ्यांचा गुणगौरव, नारीशक्तीचा कार्यक्रम, मन्मथ स्वामी जयंती, आयटी अंतर्गत विद्यार्थ्यांचा प्रवेश यासह राबवीत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली

महात्मा बसवेश्वर, जगद्गुरु रेणुकाचार्य व मन्मथ माऊली यांच्या तस्वीरेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केले. यावेळी उपस्थित पंचक्रोशीतील माहेश्वर समाज बांधवांनी शिवपाठ घेतले. यावेळी निखिल सरसंबे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत स्वामी जंगम यांनी केले व आभार प्रकाश स्वामी जंगम यांनी केले.

# विवा कॉलेजला लागेल ते सहकार्य करणार –मंत्री गोगावले

**माणगाव : प्रतिनिधी**

अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर माणगाव येथील विवा कॉलेजच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते रविवार, १९ एप्रिल रोजी झाला. यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री भरत गोगावले यांनी विवा कॉलेजला लागेल ते सहकार्य करण्याचे अभिवचन दिले.

प्रोफेशनल एज्युकेशन सोसायटीचे विवा कॉलेज माणगाव या कॉलेजची नवीन प्रशस्थ जागेत इमारत बामणोली–निलगुण रस्त्यालगत साकारली जात असून या कॉलेजच्या इमारत बांधकामाचे भूमिपूजन रविवारी मंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते उत्साहात संपन्न झाले.



त्यावेळी मंत्री गोगावले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास शिवसेनेचे तालुकप्रमुख ॲड.महेंद्र माणकर, राजेंद्र साळवी,रायगड लोकसभा संपर्क प्रमुख अनिल नवगणे, माजी उपजिल्हा प्रमुख रमेश मोरे, जेष्ठ नागरिक रमेश ढेपे, कॉलजेच्या चेअरमन विनया ढेपे, प्राचार्य विवेक ढेपे, उपप्राचार्य योगेश रानभरे, नामदेव शिंदे, डॉ.परेश उभारे, कॅप्टन नरीमलसिंग रंधावा, फैमिद जामदार, प्रवीण बागवे, वैभव शेट, महेंद्र दळवी, बाळा मांजरे, ॲड.अच्युत तोंडलेकर, उमेश यादव, अनंता थळकर, दिपक तांबट, ठेकेदार प्रेम विश्वास, इंजिनिअर राजेश खैरे, मारुती चिणके, अजय कोळथरकर आदींसह कॉलेजचे शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारीवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री भरत गोगावले पुढे म्हणाले की, गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेले रमेश ढेपे यांनी विवेकला जन्म दिला नसता तर आज विवा कॉलेज झाले नसते. उसरघर सारख्या छोट्या गावातून विवेकने जन्म घेऊन त्यानंतर उच्च शिक्षण घेऊन गरिबीची जाणीव ठेवत आपल्या भागातील गरीब मुलांना मुंबई – पुणे सारख्या धर्तीवर माणगावात विविध व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाचे शिक्षण मिळावे हा उद्देश नजरेसमोर ठेऊन विवेकने विवा कॉलेज सुरू केले. हे कॉलेज नावारूपाला आल्याशिवाय राहणार नाही. गरीब मुलांसाठी काम करणारे विवेक ढेपे व त्यांचे सर्व सहकारी याना मी मनापासून धन्यवाद देतो.

या कॉलेजला जे सहकार्य लागेल ते मी करेन. या कॉलेमधून चांगले विद्यार्थी तयार व्हावेत अशी इच्छा व्यक्त करीत विवेक ढेपे, विनया ढेपे व त्यांच्या सर्व सहकार्यांना मनापासून शुभेच्छा दिल्या.

# सविता शींदची रायगड पोलीस दलात निवड

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यातील वाशी ग्रामपंचायत हद्दीतील कारिवणे गावातील आदिवासी समाजातील सविता चंद्रकांत शीद हिने रायगड पोलीस शिपाई भरतीमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत ग्रामीण भागातील मुलींसमोर आदर्श निर्माण केला आहे.

सविता हिने इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण कारिवणे येथील रा. जि. प. शाळेत पूर्ण केले. त्यानंतर ५ वी ते १० वी शिक्षण उत्तेखोल येथील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत, ११ वी ते १२वी शिक्षण ग. बा. वडेर हायस्कूल, सुधागड पाली येथे पूर्ण केले. पुढे पनवेल येथील महात्मा फुले आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्समधून बीएससी पदवी संपादन केली. लहानपणापासून पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून सविता हिने त्या दिशेने ठामपणे वाटचाल केली. गेल्या दीड वर्षांपासून नाशिक येथील शौर्य करिअर अकॅडमी येथे तिने शारीरिक व लेखी परीक्षेची कठोर तयारी केली. सातत्यपूर्ण सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर तिने हे यश मिळवले.

रायगड पोलीस भरतीमध्ये सविता हिने मैदानी चाचणीत ४२ गुण, लेखी परीक्षेत ८६ गुण मिळवत एकूण १२८ गुणांची दमदार कामगिरी नोंदवली. विशेष म्हणजे एसटी प्रवर्गात टॉपर ठरत ओपन प्रवर्गातून पाचवा क्रमांक मिळवत तिने रायगड पोलीस दलात निवड निश्चित केली.



**मुरूड : जिंदाल विद्यामंदिर शाळा साळाव येथील विद्यार्थी दीप घाटवल इयत्ता दहावी सीबीएससी याने बोर्डमधून ९८ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. याबद्दल ऊसरोल ग्रामपंचायतचे माजी सरपंच व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते मनीष नांदगावकर यांनी दीपचे अभिनंदन केले.**

# कुंभार समाजाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**



कुंभार समाज सामाजिक संस्था जिल्हा रायगड या संस्थेचा चौथा वर्धापन दिन सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. संस्थेचे अध्यक्ष अनंत महाडकर, युवाअध्यक्षः.शरद कुंभार सचिवः .दिलीप साळवी, महिला अध्यक्षा.प्रतिभा वाडेकर तसेच सर्व जिल्हा कार्यकारिणी सदस्य व सर्व तालुका अध्यक्ष युवक, महिला पदाधिकारी यांच्या नियोजना खाली उत्कृष्टरित्या पार पडला. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे समाजासाठी दिर्घकाळ योगदान देणाऱ्या नामवंत कार्यकर्त्यांना आणि जेष्ठ वेक्तींना " जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

आपल्या भाषणात संस्थेचे अध्यक्ष अनंत महाडकर यांनी संस्थेचा एक वर्षाचा लेखाजोखा समाजा पुढे आढावा घेतला. भविष्यात समाजासाठी अधिक ठोस उपक्रम राबविण्याचा मानस आहे. असे भाषणात सांगितले.

या कार्यक्रमावेळी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेश संस्थापक अध्यक्ष सतिशदादा दरेकर, प्रदेश अध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, प्रदेश कार्याध्यक्ष महेशदादा सायकर, प्रदेश महिला अध्यक्ष व नवनिर्वाचित नगरसेविका रसिका खेडेकर, प्रदेश युवा अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष गजानन चौलकर, सरचिटणीस राजेंद्र मांगरुळकर, सरचिटणीस, संतोष चौलकर, शरद वाडेकर, कोकण विभागीय अध्यक्ष प्रकाश साळवी, कोकण विभाग महिला आघाडी अध्यक्षा मीना चौलकर, ठाणे जिल्हा अध्यक्ष भास्कर कल्याणकर, समाज सेवक यशवंत कुंभार, कोकण विभागीय उपाध्यक्ष जितेंद्र पांभरेकर, कोकण विभागीय युवा अध्यक्ष सतीश येलमकर, सत्कारमूर्ती नवनिर्वाचित नगरसेवक महेशदादा कोलाटकर(रोहा) नगरसेविका संध्याताई पालवणकर जिल्हा परिषद सदस्य ज्योती रमेश नागावकर मुरुड व इतर सर्व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र कुंभार समाजातील प्रमुख पाहुणे यांनी आपल्या भाषणात समाजाच्या सर्वांगीन प्रगतीवर भर दिला.

जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यांचे कौतुक करतांना मान्यवर म्हणाले" आज ज्यांचा सन्मान झाला आहे ते समाजासाठी दिपस्तंभ आहेत. त्यांच्या कार्यांचा आदर्श घेऊन तरुण पिढी ने समाजसेवेचा व्रत अंगीकारले पाहिजे. उपस्थितांच्या उत्साह पुर्ण प्रतिसाधाने हा सोहळा केवळ कार्यक्रम न राहता समाज प्रबोधन सेवेचा व्यासापीठ ठरला पाहिजे.

कार्यक्रमाचे सुंदर व प्रभावी सुत्रसंचालन युवा अध्यक्ष शरद कुंभार यांनी मार्मिक शब्द पद्धतीने आणि ओघवत्या शैलीने कार्यक्रमात रंगत आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा पदाधिकारी कार्याध्यक्ष रमेश कुंभार, उपाध्यक्षः नंदकुमार चिरनेरकर, खजिनदार सुनील अंजार्लेकर, उपखजिनदार अरुण बामणोलकर, उपसचि अनिल नागोठकर, कार्यालय सचिव मधुकर कुंभार, महिला पदाधिकारी वैजयंता उकरुळकर, सोनाली सोनावणे दिपाली खैरकर, वर्षा पालवणकर, कविता नागावकर, रेणुका थळकर, सुजाता नागोठणेकर, ज्योती कुंभार व इत्यादी पदाधिकारी युवक महिला समाज बांधव यांनी चांगल्या पद्धतीने मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. व्यवस्थापनः माणगाव–तळा तालुका कुंभार समाज अध्यक्ष दिनेश रातवडकर, सचिव महेंद्र देवरुस्कर, इतर पदाधिकारी समाज बांधव यांनी चांगल्या प्रकारे व्यवस्था केली.

## महात्मा बसवेश्वर महाराज जयंती

**कर्जत** : जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी लिंगायत वाणी समाजाचे बांधव उपस्थित होते.

कर्जत नगर परिषदेमध्ये महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांनी बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी नगरसेवक महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, राजाभाऊ कोठारी, रामदास गायकवाड, नेहा शिंदे, कार्यालयीन अधिक्षक रवींद्र लाड, सुरेश पिंपरे, प्रकाश नगरकर, सतीश पिंपरे, महेश पुरवंत, सतीश विभुते, हेमंत खुडे आदी उपस्थित होते.



# कर्जतमध्ये परशुराम जयंती



**कर्जत : प्रतिनिधी**

शनी मंदिराच्या रवी किरण सभागृहात सर्वशाखीय ब्राम्हण सभेच्या वतीने श्री परशुराम जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. श्री परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलनाने समारंभाचे उदघाट्न करण्यात आले.

यावेळी कर्जत सर्वशाखीय ब्राह्मण सभेचे अध्यक्ष महेश वैद्य उपाध्यक्ष संजीव दातार, सचिव विशाल जोशी, खजिनदार प्रज्ञा परांजपे, सह सचिव सायली जोशी उपस्थित होते. यावेळी समाजातील गुणवंत विजय कुमार गोखले, सतीश मुसळे, डॉ. प्रशांत गांगल, प्रमोद करंदीकर, रंजना करंदीकर, चंद्रशेखर भडसावळे, अनुराधा भडासावळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शैलेश मराठे यांनी अमृत योजनेची माहिती सांगितली. मधुस्मिता मावळणकर यांनी २६ एप्रिल ते २ मे २०२६ या कालावधीत लहान मुलांसाठी मोफत स्तोत्र पठण वर्ग आयोजित केला आहे. त्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन केले. सूत्रसंचालन ॲड. गायत्री परांजपे यांनी केले.

यावेळी श्रीराम पुरोहित, पांडुरंग गरवारे, संतोष वैद्य, पराग दातार, अलका मुसळे, अविनाश वैद्य, प्राजक्ता गरवारे, रश्मी गांगल, मिताली करमरकर, पूजा गोखले, वैदेही पुरोहित, मधुस्मिता मावळणकर, अक्षय जोशी, अथर्व जोशी, केतन गडकरी आदी उपस्थित होते.

# मुंबईचा गुजरातवर दमदार विजय

## तिलक वर्माचे शतक, अश्वनी कुमारच्या चार विकेट





**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

तिलक वर्माच्या विक्रमी जलद शतकी खेळीनंतर अश्वनी कुमार याने केलेल्या भेदक माऱ्याच्या जोरावर मुंबई इंडियन्सच्या संघाने पराभवाची मालिका खंडीत करत अखेर यंदाच्या हंगामातील दुसरा विजय नोंदवला. दुसऱ्या बाजूला अहमदाबादच्या घरच्या मैदानात २०० धावांचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सवर ९९ धावांनी पराभवाची नामुष्की ओढावली.

मुंबई इंडियन्सच्या संघाने पाच सामन्यानंतर पहिल्यांदाच गुजरात टायटन्सला घरच्या मैदानात पराभूत करत खास विक्रम रचला. मुंबईचा आयपीएलच्या इतिहासातील हा चौथा सर्वात मोठा विजय ठरला, तर गुजरात टायटन्सच्या नावे आयपीएल इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाची निच्चांकी धावसंख्येची नोंद झाली.

अहमदाबादच्या मैदानात नाणेफेक गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सच्या संघाने पॉवर प्लेमध्ये ४४ धावांवर तीन विकेट्स गमावल्या होत्या. संघ अडचणीत असताना तिलक वर्मा आणि नमन धीर जोडी जमली. या दोघांनी अर्धशतकी खेळीसह संघाचा डाव सावरला. नमन ३२ चेंडूत सहा चौकार आणि एक षटकार मारून ४५ धावांवर बाद झाल्यावर तिलकने अविश्वसनीय आणि विक्रमी शतक झळकावले. त्याने ४५ चेंडूत आठ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने केलेल्या नाबाद १०१ धावांच्या खेळीच्या जोरावर मुंबई संघाने निर्धारित २० षटकात ५ बाद १९९ धावा करत गुजरात टायटन्ससमोर २०० धावांचे टार्गेट सेट केले होते. गोलंदाजीत गुजरातकडून रबाडाने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. याशिवाय मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी प्रत्येकी विकेट आपल्या खात्यात जमा केली.

धावांचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सची सुरुवात खराब झाली. यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच पहिले षटक घेऊन आलेल्या जसप्रीत बुमराहने पहिल्याच चेंडूवर साई सुदर्शनला माघारी पाठवले. वॉशिंग्टन सुंदरने १७ चेंडूत केलेल्या २६ धावा वगळता गुजरातच्या कोणत्याच बॅटरचा मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांसमोर निभाव लागला नाही. परिणामी गुजरातचा डाव १५.५ षटकांत १०० धावांवरच आटोपला. मुंबई इंडियन्सकडून अश्वनी कुमार याने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. अल्लाह गझनफर आणि मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी दोन, तर बुमराह आणि पांड्याने एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

# एमसीए निवड चाचणी स्पर्धेत रायगडच्या स्वराज गोवारीचे द्विशतक



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १६ वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा दोनदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या संघाचा सलामीवीर स्वराज गोवारीने द्विवशतक झळकावले. पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशनविरुद्धच्या सामन्यात त्याने ही कामगिरी केली.

पुणे येथील लिजेंड क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर झालेल्या सामन्यात पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा संघ प्रथम फलंदाजी करताना २८.२ षटकांमध्ये अवघ्या ५४ धावसंख्येवर गारद झाला. रायगडचा जलदगती गोलंदाज तनिष्क जातूषकरण याने पाच फलंदाजांना बाद केले, तर विराज पाटीलने चार बळी टिपले. रायगडच्या पहिल्या डावात सलामीवीर स्वराज गोवारी याने चौफेर फटकेबाजी करत नाबाद २०३ धावा काढत द्विशतक झळकावले. त्याला भव्यम याने ५८ आणि आशीर्व पाटीलने नाबाद ६४ धावा काढून साथ दिली.

रायगडच्या संघाने १ बाद ३३७ या धावसंख्येवर आपला पहिला डाव घोषित केला. रायगडने पहिल्या डावात २८३ धावांची भक्कम आघाडी घेतली आहे. शेवटचा दिवशी रायगडचा संघ निर्णायक विजय मिळवेल अशी अपेक्षा आहे. या आधीच्या सामन्यात रायगडच्या संघाने विलास स्पोर्ट्स अकॅडमी पुणे आणि स्टार्स क्रिकेट क्लब पुणे या संघांवर विजय मिळवला होता.



# किकबॉक्सिंग स्पर्धेत कळंबोली शाळेचे यश

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल सिटी किकबॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने पनवेल सिटी किकबॉक्सिंग चषक २०२६ ही राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा सेंट अँड्र्यूज इंटरनॅशनल स्कूल, पनवेल येथे पार पडली. या स्पर्धेत विविध तालुक्यांतील स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या प्रतिष्ठित स्पर्धेत मएसो क्रीडावर्धिनी (मराठी माध्यम) शाळा कळंबोली येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले. यात ओम कोठावळे याने सुवर्णपदक, अनुष्का गोरड, श्री वीरकर, कर्तव्य धनगर आणि स्वरा कालेल यांनी रौप्यपदक जिंकले. या सर्व खेळाडूंची राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

मएसो ज्ञानमंदिर कळंबोली शाळेच्या मुख्याध्यापिका संजना बाईत यांनी विजेत्या सर्व खेळाडूंचे आणि प्रशिक्षक सिद्धेश कदम यांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# चेन्नईला धक्का! आयुष म्हात्रे आयपीएलमधून बाहेर



**चेन्नई : वृत्तसंस्था**

दमदार फॉर्मात असणारा युवा धडाकेबाज फलंदाज आयुष म्हात्रे उर्वरित आयपीएल हंगामात खेळू शकणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. चेन्नई सुपर किंग्स संघासाठी हा मोठा धक्का आहे.

यंदाच्या हंगामात आयुषने चेन्नईसाठी सर्वाधिक धावा केल्या आहेत. १८ वर्षीय आयुषला सनरायझर्स हैदराविरुद्धच्या लढतीत मांडीच्या स्नायूंना दुखापत झाली होती. चेन्नईच्या फिजिओंनी मैदानात धाव घेत त्याच्यावर उपचार केले होते. त्यानंतर आयुष पुन्हा खेळण्यासाठी सज्ज झाला. कर्णधार ऋतुराज गायकवाडने एकेरी धाव घेतली, पण दुखापत गंभीर असल्याने आयुषने लंगडत कशीबशी ही धाव पूर्ण केली. तो रनआऊट होता होता वाचला. फिजिओ पुन्हा मैदानात आले, मात्र त्याला खेळता येणार नसल्याचे स्पष्ट झाले.

आयुषची दुखापत बरी होण्यासाठी ६ ते १२ आठवड्यांचा कालावधी लागणार असल्याने उर्वरित हंगामात तो खेळू शकणार नाही, असे चेन्नई सुपर किंग्सने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. चेन्नईचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी पायाला झालेल्या दुखापतीमुळे या हंगामात एकही सामना खेळू शकलेला नाही. मधल्या फळीतील आक्रमक फलंदाज डेवाल्ड ब्रेव्हिसही काही सामने दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. डावखुरा वेगवान गोलंदाज खलील अहमद दुखापतग्रस्त झाल्याने उर्वरित हंगामात खेळू शकणार नसल्याचे स्पष्ट झाले होते. त्यातच आयुषची भर पडल्याने चेन्नईच्या अडचणी वाढल्या आहेत.





# कळंबोलीत रंगली गुरूव्हिला क्रिकेट प्रीमियर लीग

**कळंबोली : प्रतिनिधी**

कळंबोलीतील गुरूव्हिला हाऊसिंग सोसायटी आणि गणेश मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सोसायटीतील तरुणांसाठी गुरूव्हिला क्रिकेट प्रीमियर लीग आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत गुरुव्हिला टायटन्स संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचे उद्‌घाटन पनवेल महापालिकेचे स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम आणि शिवसेना शिंदे गटाचे महानगर जिल्हाप्रमुख व नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष जगदीश पाटील, सचिव उमाकांत गव्हाणे, खजिनदार राजेंद्र सरगर, सदस्य गहिनीनाथ धुमाळ, गणेशोत्सव मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश माने, क्रिकेट सामन्यांचे आयोजक राजू उतेकर, संजय पवार, सचिन लोंढे उपस्थित होते.

या स्पर्धेत सहा संघांनी सहभाग नोंदवला. यामध्ये गुरूव्हिला पँथर्स, गुरूव्हिला स्ट्रायकर, गुरूव्हिला टायटन्स, गुरूव्हिला वॉरियस, गुरूव्हिला किंग्स आणि गुरूव्हिला लायन्स यांचा समावेश होता. यामध्ये प्रीमियर लीग मध्ये एकूण १५ साखळी सामने खेळले गेले. यामध्ये गुरूव्हिला टायटन्स संघाने बाजी मारली. विजेत्या संघाला आयोजकांकडून ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले.

# क्रिकेट स्पर्धेत जय भवानी संघ विजेता



**नालासोपारा : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण गुणवत्तेला वाव देण्यासाठी धारवली कुणबी विकास मंडळाच्या वतीने नालासोपारा येथील फनफिस्ट मैदानावर क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत यजमान जय भवानी क्रिकेट संघाने अजिंक्यपद पटकावले.

या स्पर्धेचे उद्‌घाटन शिवसेनेचे विरार शाखाप्रमुख विवेक शिवाजी पवार यांच्या हस्ते झाले, तर बक्षीस वितरण समारंभाला राष्ट्रवादी काँग्रेसचे श्रीवर्धनमधील नेते सुजित तांदळेकर यांची उपस्थिती लाभली.

प्रथम तीन क्रमांक विजेत्या संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात आले. यासोबतच स्पर्धेतील मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज आणि गोलंदाज यांनाही गौरविण्यात आले.




# मुंबईच्या विजयाने आयपीएलमध्ये बदलले समीकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात मुंबई इंडियन्सने कोलकाता नाईट रायडर्सवर दमदार विजयाची नोंद केली होती. त्यानंतर झालेल्या सर्व सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्सला पराभवाचा सामना करावा लागला होता. आता गुजरात टायटन्सला पराभूत करून मुंबई इंडियन्सची गाडी पुन्हा एकदा रुळावर आली आहे. या सामन्याआधी मुंबईचा संघ गुणतालिकेत तळाशी होता, पण हा सामना जिंकताच मुंबईचा संघ गुणतालिकेत सातव्या स्थानी पोहचला आहे. मुंबईच्या विजयामुळे तीन संघांना मोठा धक्का बसला आहे.

आयपीएल गुणतालिकेत श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या पंजाब किंग्जचा बोलबाला पहायला मिळाला आहे. पंजाबने आतापर्यंत एकही सामना गमावलेला नाही. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने आतापर्यंत ११ गुणांची कमाई केली आहे. त्यानंतर दुसऱ्या स्थानी असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आठ गुणांची कमाई केली आहे. तिसऱ्या स्थानी असलेल्या राजस्थान रॉयल्सचे आठ गुण झाले आहेत. इशान किशनच्या नेतृत्वाखाली खेळत असलेला सनरायझर्स हैदराबादचा संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानी आहे.

गुजरात टायटन्स आणि दिल्ली कॅपिटल्सनेदेखील ६-६ गुणांची कमाई केली आहे, पण नेट रनरेट काम असल्याने या दोन्ही संघांना टॉप ४मध्ये प्रवेश करता आलेला नाही. दुसऱ्या विजयासह मुंबई इंडियन्सचा संघ थेट सातव्या क्रमांकावर जाऊन पोहचला आहे. मुंबई सातव्या स्थानी पोहचल्यानंतर चेन्नई सुपर किंग्ज, कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनऊ सुपर जायंट्स संघाला मोठा धक्का बसला आहे. या तिन्ही संघांचे गुण मुंबई इंडियन्सपेक्षा कमी आहेत.

# रबाडाने लसिथ मलिंगाला टाकले मागे




**नवी दिल्ली** : आयपीएलमध्ये सोमवारी मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्स संघावर मात करून जोरदार पुनरागमन केले. असे असले तरी गुजरातकडून कगिसो रबाडाने सुरुवातीलाच तीन गडी बाद करीत पॉवरप्लेमध्ये आपली ताकद दाखवली.

या सामन्यात कगिसो रबाडाने पॉवरप्लेमध्ये दमदार गोलंदाजी केली. त्याने मुंबई संघाचे सलामीवीर दानिश मालेवार, क्विंटन डीकॉक आणि सूर्यकुमार यादवला बाद करत माघारी धाडले. आयपीएल स्पर्धेत पावरप्लेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विदेशी गोलंदाजाचा रेकॉर्ड हा मुंबईचा वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टच्या नावावर आहे. त्याच्या नावे या स्पर्धेतील पॉवरप्लेमध्ये गोलंदाजी करताना एकूण ७२ गडी बाद करण्याची नोंद आहे. या यादीत आता कगिसो रबाडाचा समावेश झाला आहे. त्याने पॉवरप्लेमध्ये गोलंदाजी करताना आतापर्यंत ३८ गडी बाद केले आहेत. यासह त्याने मुंबईचा माजी वेगवान गोलंदाज लसिथ मलिंगाला मागे टाकले. मलिंगाने या स्पर्धेत ३७ गडी बाद केले होते.




# वैभव सूर्यवंशी भारतीय क्रिकेटचे भविष्य -श्रेयस अय्यर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या चालू हंगामात आपल्या स्फोटक फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या राजस्थान रॉयल्सच्या वैभव सूर्यवंशी या युवा खेळाडूवर पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने स्तुतिसुमने उधळली आहेत. वैभव हा एक विलक्षण प्रतिभावान खेळाडू असून तो भारतीय क्रिकेटचे भविष्य असल्याचे मत अय्यरने व्यक्त केले आहे.

आयपीएल २०२६च्या हंगामात वैभव सूर्यवंशी एका नव्या अवतारात समोर आला आहे. त्याने आतापर्यंत खेळलेल्या सहा डावांत २३६पेक्षा अधिकच्या विस्मयकारक स्ट्राईक रेटने २४६ धावा कुटल्या आहेत. सलामीला येत निर्भयपणे खेळण्याच्या त्याच्या शैलीने क्रिकेटविश्वात मोठी खळबळ माजवली आहे. वैभवच्या या कामगिरीबद्दल बोलताना श्रेयस अय्यर म्हणाला, वैभव ही एक देदीप्यमान प्रतिभा आहे. त्याच्या कौतुकासाठी शब्दही अपुरे पडतील. चेंडू पडण्यापूर्वीच त्याची बॅट ज्या प्रवाहाने फिरते आणि तो जी लय प्राप्त करतो, ते पाहता तो निश्चितच भविष्यातील मोठा खेळाडू आहे.

श्रेयस पुढे म्हणाला, मी जेव्हा इतर खेळाडूंशी संवाद साधतो, तेव्हा त्यांना एकच संदेश देतो तुम्ही जसे आहात तसेच राहा. कोणाचेही अनुकरण करण्याचा प्रयत्न करू नका. जेव्हा तुम्ही तुमच्या स्वतःच्या शैलीत निर्भय आणि आक्रमक असता, तेव्हा तुम्हाला कोणाचीही नक्कल करण्याची गरज उरत नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com